# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक १९३) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) गुरुवार, दि.३० जुलै २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## मृत्यूनंतर दोन वर्षांनी माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांना कोळसा खाण घोटाळाप्रकरणी क्लीन चिट

नवी दिल्ली दि.२९ (वृत्तसंस्था)- कोळसा खाण वाटप प्रकरणात माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्यावर दाखल झालेला खटला अखेर रद्द करण्यात आला आहे. यूपीए सरकारच्या काळात भाजपा आणि विरोधकांनी या घोटाळ्यावरून रान उठवले होते. सीबीआयने दाखल केलेल्या क्लोजर रिपोर्टनंतर सर्वोच्च न्यायालयाकडून खटला रद्द करण्यात आल्यामुळे डॉ. मनमोहन सिंग यांच्या मृत्यूच्या दोन वर्षांनंतर त्यांना या प्रकरणी क्लीन चिट मिळाली. डिसेंबर २०२४ मध्ये माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांचे निधन झाले.

सरन्यायाधीश सूर्य कांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. यावेळी सर्वोच्च न्यायालयाने सत्र न्यायालयाचा २०१५ सालचा निर्णय रद्द केला. सीबीआयचा क्लोजर रिपोर्ट फेटाळण्याचे सत्र न्यायालयाकडे कोणतेही ठोस कारण नव्हते, अशी प्रतिक्रिया यावेळी सर्वोच्च न्यायालयाने दिली.

सीबीआयने ऑगस्ट आणि ऑक्टोबर २०१४ मध्ये सत्र न्यायालयासमोर खटला बंद करण्यासाठी क्लोजर रिपोर्ट सादर केला होता. माजी पंतप्रधान डॉ. सिंग यांच्याविरुद्ध कोणताही गुन्हा नसल्याचे म्हटले होते. तथापि, विशेष न्यायाधीशांनी हा अहवाल फेटाळून लावला होता. तसेच मार्च २०१५ साली डॉ. मनमोहन सिंग यांना खटल्याला सामोरे जाण्यासाठी समन्स बजावले.

## विरोधकांच्या गदारोळात लोकसभेत परीक्षा सुधारणा विधेयक आवाजी मतदानाने मंजूर

नवी दिल्ली दि.२९ (वृत्तसंस्था)- नीट परीक्षेतील पेपरफुटी प्रकरणात धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा द्यावा लागला. कॉक्रोच जनता पार्टीने आंदोलन केलं होतं आणि धर्मेंद्र प्रधान यांना या प्रकरणी राजीनामा द्यावा लागला. दरम्यान यानंतर मागचे दोन दिवस लोकसभेत परीक्षा सुधारणा विधेयकावर चर्चा सुरु होती. हे विधेयक आवाजी मतदानाने मंजूर झालं आहे. विरोधकांच्या गदारोळात हे विधेयक आवाजी मतदानाने मंजूर झालं आहे. नीट पेपर फुटी प्रकरणानंतर हे बिल आता लोकसभेत सादर करण्यात आलं होतं. दोन दिवस या बिलावर चर्चा झाल्यानंतर आज ते आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आलं.

सरकारच्या विविध सार्वजनिक परीक्षा आणि भरती परीक्षा या कायद्याच्या कक्षेत येतात. त्यामध्ये नॅशनल टेस्टिंग एजन्सी मार्फत घेतल्या जाणाऱ्या नीट-यूजी, जेईई, यूजीसी-नेट आणि सीयूईटी या परीक्षांचा समावेश आहे. याशिवाय यूपीएससी, कर्मचारी निवड आयोग, रेल्वे भरती मंडळ, आयबीपीएस तसेच केंद्र सरकारच्या विविध भरती परीक्षा या कक्षेत येतात. आता, पेपरफुटीशी संबंधित गुन्ह्यांसाठी कमाल १० वर्षांचा तुरुंगवास आणि १० कोटी रुपयांपर्यंतच्या दंडाची शिक्षा आहे. परीक्षांमधील पेपरफुटी, कॉपी, तांत्रिक गैरव्यवहार आणि संघटित फसवणुकीवर अधिक कठोर कारवाई करण्यासाठी या कायद्यात महत्त्वाच्या दुरुस्ती करण्यात आल्या आहेत. देशभरात - पेपरफुटीच्या निषेधार्थ झालेल्या आंदोलनांनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी परीक्षा गैरव्यवहाराविरोधातील कायदेशीर चौकट अधिक मजबूत करण्यासाठी सरकार तातडीने पावले उचलेल, अशी घोषणा केली होती, त्यानुसार आता सुधारणा विधेयक मंजूर करण्यात आलं आहे.

### परीक्षा सुधारणा विधेयकात काय तरतुदी आहेत?

१) सेक्शन १ आणि सेक्शन १० यामध्ये ३ ते ५ वर्षांची शिक्षा अशी तरतूद होती. तसंच ५ ते १० लाख दंडाची तरतूद होती. आता जे सुधारणा विधेयक आणलं गेलंय त्यात १० वर्षांचा कारावास आणि जास्तीत जास्त ५० लाख रुपये दंडाची तरतूद.

२) सेक्शन १० च्या सब सेक्शन २ मध्ये सर्व्हिस प्रोव्हाईडरचा उल्लेख आहे. कुठलीही कंपनी, कुठलीही प्रोपरायटरशिप असे सगळेच. त्यासाठी एक कोटी रुपये दंडाची तरतूद होती तो दंड वाढवून आता ५ कोटी रुपये करण्यात आला आहे.

३) पेपरफुटीसंदर्भातली सगळी प्रकरणं फास्ट ट्रॅक कोर्टात सगळी प्रकरणं चालवली जातील आणि न्यायदान लवकरात लवकर म्हणजे दोन महिन्यांच्या आत तपास पूर्ण करुन पुढील तीन महिन्यात न्यायालयात निर्णय दिला जाईल. म्हणजेच गुन्हा दाखल झाल्यापासून पुढच्या पाच महिन्यांत न्यायदान होईल.

४) पेपरफुटीच्या संघटित टोळ्या किंवा रॅकेटवर आणखी कठोर कारवाई करण्यासाठी दंडाची कमाल मर्यादा मोठ्या प्रमाणात वाढवण्यात आली आहे. विद्यमान कायद्यातील मर्यादेपेक्षा ती वाढवून १० कोटी रुपयांपर्यंत दंड आकारण्याचा प्रस्ताव या विधेयकात करण्यात आला आहे.

### वंदे मातरमचा अवमान ठरणार फौजदारी गुन्हा; राज्यसभेत विधेयकाला मंजूरी

लोकसभेत लोक परीक्षा संशोधन विधेयकावरुन जोरदार चर्चा रंगली होती, सत्ताधारी आणि विरोधक आक्रमक झाल्यानंतर मोठ्या गदारोळात हे विधेयक लोकसभेत मंजूर करण्यात आले. दुसरीकडे

राज्यसभेत वंदे मातरम या गीताच्या अनुंषगाने महत्त्वाचे दुरुस्ती विधेयक संमत झाले आहे. राज्यसभेत आज बुधवारी राष्ट्रीय सन्मानाचा अपमान प्रतिबंध (दुरुस्ती) विधेयक २०२६ मंजूर करण्यात आले. या विधेयकामुळे वंदे मातरम् या राष्ट्रीय गीताचा समावेश संबंधित कायद्याच्या कक्षेत करण्यात आला असून, आता राष्ट्रीय गीताचा अवमान करणाऱ्याविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल होणार आहे.

देशात काही ठराविक घोषणांवर सातत्याने वाद होतात. त्यामध्ये, जय श्रीराम किंवा वंदे मातरम हे शब्द उच्चारण्यासाठी काही जणांकडून सक्ती केल्याचाही आरोप होतो. तर, कोणाच्या सांगण्यावरुन हे शब्द देशभक्तीचे प्रतिक कसे होऊ शकतात? असा सवालही विचारला जातो. मात्र, आता वंदे मातरम या राष्ट्रीय गीताचा अवमान केल्यास फौजदारी गुन्हा दाखल केला जाईल, यासंदर्भातील विधेयक राज्यसभेत संमत झाले आहे. देशाच्या स्वातंत्र्यलढ्याचे प्रतिक म्हणून वंदे मातरम या गीताचे महत्त्व आहे.

## राज्यातील २२ जिल्ह्यांत अतिमुसळधार पावसाचा इशारा

मुंबई दि.२९ (प्रतिनिधी)- अरबी समुद्रात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे मुंबईसह राज्यातील बहुतांश भागात पावसाने पुन्हा एकदा कहर केल्याचे चित्र बघायला मिळाले आहे. अशातच अरबी समुद्रात चक्राकार वारे सक्रिय झाल्याने महाराष्ट्रात मान्सून पुन्हा सक्रिय झाला असून आगामी काळात पावसाची धुव्वाधार बॅटिंग कायम राहणार आहे. प्रादेशिक हवामान खात्याने दिलेल्या अंदाजानुसार राज्यातील २२ जिल्ह्यांना अति मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे, ज्यात रत्नागिरीला ऑरेंज, तर मुंबईला यलो अलर्ट देण्यात आला आहे. तर तिकडे विदर्भातील ३ जिल्ह्यांत अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तर तिकडे कोकणात देखील सरीवर सरी कोसळत असून पुढील काही तासात कोकण किनारपट्टी भागात मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. कोकणात पुढचे चार दिवस पावसाचा जोर वाढण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. एकूणच महाराष्ट्रात मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस होणार असून हवामान खात्याकडून २२ जिल्ह्यांना अलर्ट देण्यात आला आहे. संभाव्य परिस्थिती लक्ष्यात घेता नागरिकांनी खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

प्रादेशिक हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार २९ जुलै २०२६ (बुधवार) विदर्भातील गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोलीला ऑरेन्ज अलर्ट देण्यात आला आहे. तर मुंबई वगळता संपूर्ण महाराष्ट्राला यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर ३० जुलै २०२६, (गुरुवार) जळगाव, चंद्रपूर, पुणे घाट आणि सातारा घाटमाथ्यावर ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर घाटमाथा, पुणे जिल्हा आणि सातारा जिल्हा, अहिल्यानगर, नाशिक, धुळे, नंदुरबार, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, परभणी, नांदेड, हिंगोली, बुलढाणा, अकोला, वाशीम, यवतमाळ, अमरावती, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोलीला यलो अलर्ट देण्यात आला आहे.

भंडारा जिल्ह्यात मागील ४८ तासांमध्ये पावसानं जोरदार हजेरी लावलेली आहे. काल दिवसभर पावसानं हजेरी लावल्यानंतर सायंकाळच्या सुमारास उसंत घेतली होती. मात्र, रात्रीच्या सुमारास पुन्हा एकदा पावसानं जोरदार बॅटिंग केली. भंडारा, मोहाडी, तुमसर, पवनी, लाखांदूर, साकोली, लाखनी या सातही तालुक्यात रात्रीला पावसानं हजेरी लावल्यानं शेतकरी चिंतामुक्त झालाय. भातपीक लागवड आता जोमात सुरू असून आज हवामान विभागानं भंडारा जिल्ह्याला ऑरेंज अलर्ट दिल्यानं प्रशासन सतर्क आहे.

## अमित शाह दोषी तरी आहेत किंवा अकार्यक्षम; राहुल गांधी यांची टीका



नवी दिल्ली दि.२९ (वृत्तसंस्था)- परीक्षा सुधारणा विधेयकावर लोकसभेत आज चर्चा सुरु झाल्यानंतर दुपारी विरोधी पक्षनेते राहुल गांधींनी सरकारवर जोरदार टीका केली. अश्रूधुर आणि पॅलेट गन चालविण्याचे आदेश कोणी दिले?, गृहमंत्री सभागृहात का उपस्थित नाहीत? असे सवाल राहुल गांधींनी उपस्थित केले. राहुल गांधींच्या भाषणावेळी झालेल्या गोंधळानंतर दोनवेळा कामकाज स्थगित करण्यात आले. दरम्यान, सभागृहातून बाहेर पडल्यानंतर राहुल गांधींनी माध्यमांशी संवाद साधताना, ''अमित शाह एकतर दोषी आहेत किंवा अकार्यक्षम'', अशा शब्दात टीका केली.

संसद परिसरात राहुल गांधींनी माध्यमांशी संवाद साधला. ''मी एक साधा प्रश्न विचारला. दोनच शक्यता असू शकतात. एकतर गृहमंत्र्यांनी फायरिंगचे आदेश दिले किंवा त्यांना फायरिंग झाल्याची कल्पनाच नाही. पहिल्या शक्यतेनुसार ते दोषी आहेत आणि दुसऱ्या शक्यतेनुसार ते अकार्यक्षम, यापेक्षा दुसरी शक्यता असूच शकत नाही. गृहमंत्र्यांनी फायरिंग झाल्याची माहिती नाही तर ते अकार्यक्षम आहेत. आणि, त्यांनी आदेश दिले असतील तर ते दोषी आहेत, एवढाचा माझा मुद्दा आहे'', असे राहुल गांधी म्हणाले.

गृहमंत्री चर्चेवेळी सभागृहात उपस्थित नसल्याचा मुद्दाही त्यांनी यावेळी उपस्थित केला. ''ते आज सभागृहात उपस्थित नव्हते. ते का येत नाहीयेत? त्यांना तर देशाचे धाडसी गृहमंत्री म्हटले जाते. त्यांनी जर आदेश दिलेले नाहीत तर त्यांनी येऊन सभागृहात तसं सांगावं'', असे राहुल गांधी म्हणाले. राहुल गांधींनी ते बोलत असताना त्यांचा माईक बंद करण्यात आल्याचा आरोपही केला. यावरुन बोलताना, ''मला संसदेत बोलण्याचा अधिकार आहे. आणि मला तो अधिकार बजावू द्यायला हवा'', असेही राहुल गांधी म्हणाले.

## शेतकऱ्यांनो अजिबात काळजी करू नका, २ लाख थकबाकी असलेल्या सर्वांची कर्जमाफी होणार-कृषिमंत्री दत्तात्रय भरणे

मुंबई दि.२९ (प्रतिनिधी)- पीक विमा योजनेच्या धोरणात कुठलाही बदल करण्यात येणार नसून जुने तेच धोरण यंदा देखील कायम राहणार आहे. अडचणी येऊ नये म्हणून या संदर्भात काम केलं आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या फायद्याचं काम होईल, धोरणात कुठले ही बदल केले नाहीत. अशी माहिती राज्याचे कृषी मंत्री कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली आहे. तर राज्यातील ३१लाख प्रोत्साहन अनुदान लाभार्थी आहे. त्यातील १७ लाख लोकांपर्यंत कर्जमाफी देत आहोत. प्रोत्साहन अनुदान तिसऱ्या किंवा चौथ्या यादीत येईल. यात ५ लाख लोकांनी केवायसी झालेले आहे. त्यामुळे त्यांना रक्कम द्यायला कुठली ही अडचण येणार नाही अशी देखील माहिती कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. राज्यातील २३ लाख शेतकऱ्यांची प्रोत्साहन यादी आहे. त्यामुळे अजिबात काळजी करू नका. रक्कम कमी आली असली तरी वरची रक्कम राष्ट्रकृत बँक देणार असल्याचेही ते म्हणाले.

छत्रपती शिवाजी महाराज योजनेतील जे शेतकरी राहिले होते त्यांना रक्कम दिली जाईल. यात पात्र शेतकऱ्यांना त्यांची रक्कम मिळणार आहे. तसेच साखरेच्या भावात वाढ झाली आहे. त्याचा फायदा नक्की शेतकऱ्यांना होणार आहे. मराठवाड्यात कमी पाऊस पडत असून आतापर्यंत मराठवाडा विभागात ७७ टक्के पाऊस पडलाय. तर कोकणात पाऊस जास्त आहे. कोकणात पेरणी ८४ टक्के पेक्षा जास्त झाली आहे. तर तिकडे अमरावतीत ९२ टक्के पेरणी झाली असून ठाणे जिल्ह्यात सर्वांत कमी पेरणी झाली आहे. मका, सुर्यफुल पीक पेरणी यंदा जास्त असून ४५ लाख १० हजार हेक्टर पेरणी झाली आहे. २४ हजार हेक्टर सोयाबीन पेरणीबाबत तक्रारी आल्या आहेत. खताचा साठा राज्यात मागणी प्रमाणे उपलब्ध आहे. त्यामुळे खताच्या बाबतीत घाबरण्याची गरज नाही. असेही कृषीमंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले.

## दिल्ली आंदोलनात गोळीबार झालाच नाही, केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांचा लोकसभेत दावा!

नवी दिल्ली दि.२९ (वृत्तसंस्था)- नीट पेपरफुटीप्रकरणी कॉक्रोच जनता पार्टीने २० जुलै रोजी संसद मोर्चाचं आयोजन केलं होतं. या मोर्चाला हिंसक वळण लागून विद्यार्थी आंदोलकांवर लाठीचार्ज करण्यात आला. यावेळी अनेक विद्यार्थी जखमीही झाले. दरम्यान, या आंदोलनादरम्यान गोळीबार झाला असल्याचाही दावा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केला. मात्र, हा दावा लोकसभेत खोडून काढला. केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंग यांनी यासंदर्भात सभागृहात निवेदन दिलं.

पावसाळी अधिवेशन सुरू झाल्यापासून लोकसभा आणि राज्यसभेत गदारोळ सुरू आहे. विरोधकांनी दोन्ही सभागृहात गोंधळ घातला. काल, (२८ जुलै) पासून दोन्ही सभागृहाचं कामकाज सुरू झालं असून आजही गदारोळातच खासदारांनी आपलं म्हणणं मांडण्याचा प्रयत्न केला. आज विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनीही सभागृहात आंदोलनाविषयीचं त्यांचं मत मांडलं.

''सीजेपीच्या आंदोलक विद्यार्थ्यांवर पॅलेट गन चालवण्याचे आणि त्यांचं रक्त सांडण्याचे आदेश अमित शाह यांनी दिले आहेत. त्यामुळे त्यांनी या प्रकरणी येऊन स्पष्टीकरण दिलं पाहिजे. अमित शाह सभागृहात आलेले नाहीत. कारण ते या प्रकरणी उत्तर द्यायला घाबरत आहेत. अमित शाह हे देशाचे सो कॉल्ड गृहमंत्री आहेत. त्यांच्या आदेशानेच पॅलेट गनमधून गोळ्या झाडण्यात आल्या'', असा गंभीर आरोप राहुल गांधी यांनी केला. त्यानंतर लोकसभेत जोरदार गदारोळ झाला. तुम्ही सभागृहाचे नियम मोडत आहात, असं करु नका; असं लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी राहुल गांधींना समजावलं.

लोकसभेत केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी आंदोलकांवरील कारवाईबाबत सरकारची भूमिका स्पष्ट केली. त्यांनी सांगितलं की, घटनास्थळी कोणताही गोळीबार करण्यात आलेला नव्हता, केवळ अश्रुधुराच्या नळकांड्यांचा वापर करण्यात आला होता. त्यामुळे गोळीबाराचे आदेश कोणी दिले, हा प्रश्नच उद्भवत नाही, असं त्यांनी स्पष्ट केले.

## नीट-यूजी पेपरफुटी प्रकरण; मोटेगावकर, कुलकर्णीसह १३ जणांवर सीबीआयचे ४२२ पानी आरोपपत्र

पुणे दि.२९ (प्रतिनिधी)- वैद्यकीय प्रवेशासाठी घेण्यात आलेल्या नीट-यूजी २०२६ परीक्षेतील प्रश्नफुटीप्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभागाने १३ आरोपींविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे. लातूरमधील आरसीसी कोचिंग इन्स्टिट्यूटचा संचालक शिवराज मोटेगावकर तसेच पुण्यातील एपीएमए कोचिंग इन्स्टिट्यूटचा भौतिकशास्त्र शिक्षक तेजस शाहवर फुटलेले प्रश्न विद्यार्थ्यांसाठी वापरल्याचा ठपका आहे. त्यांच्यावर गुन्हेगारी कट, फसवणूक, पुरावे नष्ट करणे यांसह भारतीय न्याय संहिता, भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा आणि सार्वजनिक परीक्षा (अनुचित साधनांना प्रतिबंध) कायदा, २०२४ अंतर्गत आरोप ठेवले आहेत.

सर्व आरोपी न्यायालयीन कोठडीत असल्याचे सीबीआयने म्हटले आहे. दोषारोपपत्रात एनटीएशी संबंधित तीन विषयतज्ज्ञांचा समावेश आहे. त्यामध्ये जीवशास्त्र तज्ज्ञ मनीषा मांढरे, रसायनशास्त्र तज्ज्ञ प्रल्हाद विठ्ठलराव कुलकर्णी आणि भौतिकशास्त्र तज्ज्ञ मनीषा संजय हवालदार यांचा समावेश आहे. या तिघांनी परीक्षेपूर्वी गोपनीय प्रश्न मिळवून ते पुढील साखळीपर्यंत पोहोचवल्याचा (पान ४ वर)

## इफ्ल्युएन्सर म्हणून पंतप्रधान मोदी चांगले, पंतप्रधान पद त्यांनी दुसऱ्याला द्यावे, अभिजीत दिपकेंची टीका

छत्रपती संभाजीनगर दि.२९ (प्रतिनिधी)- कॉक्रोच जनता पार्टीची स्थापना करून थेट केंद्रीय शिक्षण मंत्र्यांचा राजीनामा घेण्यात यशस्वी ठरलेले अभिजीत दिपके आज तब्बल ४० दिवसांनी घरी परतले. छत्रपती संभाजीनगरमधील घरी पोहोचल्यानंतर त्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले. यावेळी माध्यमांशी बोलत असताना अभिजीत दिपके यांनी सीजेपीचे आंदोलन, त्यानंतर झालेली पार्टी, खासदार कंगना रणौत यांची टीका, विद्यार्थ्यांवर दाखल झालेल्या गुन्ह्यांबाबत त्यांनी सविस्तर प्रतिक्रिया दिली.

सीजेपीच्या आंदोलनानंतर विविध राज्यांचे सरकार आंदोलकांचा माग काढून त्यांना त्रास देत आहे. सरकारने हे सोडून दिले पाहिजे. सरकारने आंदोलकांना त्रास देणे सोडले नाही तर येणाऱ्या निवडणुकांमध्ये ते सरकारला धडा शिकवतील. केंद्रीय मंत्र्यांचा राजीनामा घेऊन आंदोलकांचा राग कमी झालेला नाही. हा राग सरकारवर होता. त्यामुळे त्यांनी आंदोलकांचा छळ करणे सोडून द्यावे, असे आवाहन अभिजीत दिपके यांनी केले. पंतप्रधान मोदी यांनी इन्स्टाग्रामवर व्हिडीओ शेअर करण्यास सुरुवात केली आहे. ते व्हिडीओ तुम्ही पाहिलेत का? असाही प्रश्न यावेळी दिपकेंना विचारण्यात आला. यावर अभिजीत दिपके म्हणाले, ''मला वाटते पंतप्रधान मोदींनी आता इन्फ्लुएन्सर बनायला हवे. इन्फ्लुएन्सर म्हणून ते चांगले काम करत आहेत. पंतप्रधानांची खुर्ची त्यांनी सोडावी, ते काम दुसरा नेता करेल.'' धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिल्यानंतर कॉक्रोच जनता पार्टीने केलेल्या पार्टीवर अनेकांनी आक्षेप घेतला होता. या पार्टीबाबत यावेळी दिपकेंना प्रश्न विचारण्यात आला. त्यावर ते म्हणाले की, ३६ दिवस आमचे स्वयंसेवक रस्त्यांवर दिवस-रात्र बसून होते. त्यांच्यासाठी ती पार्टी होती. भाजपाचे लोक निवडणूक जिंकल्यावर रस्त्यांवर जल्लोष करतात. आम्ही रस्त्यावर न करता तो आतमध्ये केला. स्वयंसेवकांनी एक दिवस एन्जॉय केला असेल तर त्यात वाईट काय? २१ विद्यार्थ्यांच्या आत्महत्येनंतर ज्या प्रकारे धर्मेंद्र प्रधान यांचे संसदेत स्वागत केले गेले, त्यावर भाजपाला लाज वाटली नाही का? असाही प्रश्न अभिजीत दिपके यांनी उपस्थित केला.

## तुकाराम मुंढेंचा आता शाळांकडे मोर्चा; शाळांच्या ५० मीटर परिघात जंक फूडवर बंदी

मुंबई दि.२९ (प्रतिनिधी)- हॉटेल, रेस्टॉरंट, डेअरी आणि क्लबवरील धडक कारवाईनंतर अन्न व औषध प्रशासनाचे (एफडीए) आयुक्त तुकाराम मुंढे यांनी आता राज्यातील शाळांमधील विद्यार्थ्यांच्या आरोग्याला प्राधान्य देत मोठा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक विद्यार्थ्याला सुरक्षित, सकस आणि पोषणमूल्यांनी समृद्ध आहार मिळावा, यासाठी सेव्ह फूड फॉर एव्हरी चाइल्ड इन महाराष्ट्र ही राज्यव्यापी मोहीम राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

पत्रकार परिषदेत बोलताना मुंढे यांनी सांगितले की, राज्यातील एक लाखांहून अधिक शाळांमध्ये दोन कोटींपेक्षा जास्त विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि दर्जेदार अन्न मिळणे हा त्यांचा मूलभूत हक्क असून, त्यासाठी अन्न सुरक्षा नियमांची कठोर अंमलबजावणी केली जाणार आहे.

नव्या धोरणानुसार राज्यातील सर्व शिक्षण मंडळांच्या शाळांना हे नियम लागू राहतील. शालेय कँटीन, मध्यान्ह आहार पुरवठादार, वसतिगृहांतील मेस तसेच अंगणवाडीपासून बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना अन्न (पान ४ वर)

## मनोज जरांगेंकडून २९ ऑगस्टपासून मराठा आरक्षण आंदोलनाची घोषणा

जालना दि.२९ (प्रतिनिधी)- मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी आज पुन्हा एकदा आंदोलनाचा इशारा दिला आहे. मनोज जरांगे पाटील यांनी बोलताना म्हटले की, मराठ्यांना वेड्यात काढण्याचे काम सुरू आहे. कधी काळी समाज एकवटला त्यामुळे आपल्याला काळजीपूर्वक पुढं जायचं. २९ ऑगस्टला ३ वर्ष पूर्ण होत आहेत. आपल्याला जर कोणी वेड्यात काढत असेल त्यामुळे तुम्हाला बोलावलं. २९ ऑगस्ट रोजी पुन्हा शेवटचं निर्णायक आंदोलन करणार आहे. मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवालीतून घोषणा केली. त्यांनी थेट पुन्हा शेवटच्या आंदोलनाची घोषणा केली.सरकार ५८ लाख नोंदीचे प्रमाणपत्र देत नाही म्हणून एकदम मोठं निर्णायक आंदोलन करायचे आहे. ज्यांना माहित आहे की, आपल्या नोंदी सापडल्या त्यांनी तात्काळ अर्ज करा.

पुढे बोलताना मनोज जरांगे पाटील म्हणाले की, समाजातील लेकरांचे हाल होत आहे, गेल्या तीन वर्षांपासून रक्त जळतोय म्हणून समाजाच्या लेकरांसाठी शेवटचा निर्णायक आंदोलन करणार आहे. एकानेही घरी थांबायचं नाही, ५८ लाख नोंदीचे प्रमाणपत्र घेतल्याशिवाय सोडायचं नाही. हैद्राबाद गॅझेटीयर दिलं तर मग प्रमाणपत्र का दिल नाही. मराठ्यांना टार्गेट कश्यामुळे करता, आधी तुम्ही स्थानिक चौकशी अहवाल आणला. आता तुकडा पडल्याशिवाय राहणार. हैद्राबाद गॅझेटनुसार प्रमाणपत्र घेतल्याशिवाय आता थांबणार नाही. २९ ऑगस्टपासून जोपर्यंत आंदोलन चालणार आहे, तो पर्यंत वेळ द्या. सर्वापक्षीय नेत्यांच्या मुलांना आरक्षण लागणार आहे. २८ ऑगस्टपर्यंत हैद्राबाद गॅझेट नुसार प्रमाण पत्र द्या, असा अल्टीमेटम जरांगे पाटील यांचा सरकारला दिला आहे.

समाजाला वेड्यात काढण्याचे काम सुरू आहे. आपल्याला (पान ४ वर)

## मराठा समाजासाठी जे कुणीच केलं नाही, ते महायुतीने केलं, काही शंका असतील तर मार्ग काढू-देवेंद्र फडणवीस

मुंबई दि.२९ (प्रतिनिधी)- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज राज्यातील विविध महत्त्वाच्या घडामोडींवर सविस्तर भाष्य केले. नागपूरमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे निर्माण झालेली पूरस्थिती, मनोज जरांगे पाटील यांनी पुकारलेले आंदोलन आणि विद्यार्थ्यांचे आंदोलन या सर्वच मुद्द्यांवर त्यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली. विशेष म्हणजे, राज्यातील आंदोलक विद्यार्थ्यांवर दाखल झालेले गुन्हे मागे घेण्याचे आदेश त्यांनी गृह विभागाला दिले आहेत, असे स्पष्ट करत त्यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावरही त्यांनी टीका केली आहे.

राज्यातील विद्यार्थ्यांच्या आंदोलनाबाबत बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी दिलासादायक निर्णय जाहीर केला आहे. ते म्हणाले की, राज्यात विद्यार्थ्यांनी केलेल्या आंदोलनांदरम्यान ज्या विद्यार्थ्यांवर पोलिसांत केसेस दाखल झाल्या आहेत, त्या सर्व केसेस मागे घेण्याचे आदेश मी पोलिस आणि गृह विभागाला दिले आहेत. तसेच, या सर्व आंदोलनांदरम्यान महाराष्ट्र पोलिसांनी अतिशय संयमाची भूमिका घेतल्याचेही त्यांनी सांगितले. (पान ४ वर)

## राज्यात २ हजार शाळा बंद, पेपरफुटी सुरूच

### शिक्षण व्यवस्थेवरून संजय राऊतांचा मोदी-शहांसह राज्य सरकारवर हल्लाबोल

मुंबई दि.२९ (प्रतिनिधी)- शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी दिल्लीत घेतलेल्या पत्रकार परिषदेत राज्य आणि केंद्र सरकारवर सडकून टीका केली आहे. ''महाराष्ट्राची शिक्षण व्यवस्था पूर्णपणे रसातळाला गेली असून, राज्यात बोगस डिग्रीचा मोठा स्कॅम सुरू आहे,'' असा आरोप राऊत यांनी केला आहे. पेपरफुटी, नवीन शाळांच्या मंजुरीतील भ्रष्टाचार आणि शिक्षकांना लावली जाणारी अवांतर कामे यावरून त्यांनी राज्य सरकारला धारेवर धरले. तसेच, न्याय मागणाऱ्या आंदोलक विद्यार्थ्यांना राज्याचे मुख्यमंत्री शिव्या घालत असल्याचा गंभीर दावाही त्यांनी यावेळी केला.

संजय राऊत यांनी राज्यातील शिक्षण व्यवस्थेवर चिंता व्यक्त करत राज्य सरकारला फैलावर घेतले. राऊत म्हणाले की, ''महाराष्ट्राच्या शिक्षणात सध्या मोठी अराजकता माजली आहे. सरकारला शिक्षण व्यवस्थेबाबत अजिबात गांभीर्य राहिलेले नाही. हक्क आणि न्याय मागायला जाणाऱ्या आंदोलक विद्यार्थ्यांना राज्याचे मुख्यमंत्री चक्क शिव्या घालत आहेत, ही राज्यासाठी अत्यंत गंभीर आणि संतापजनक बाब आहे.''

राज्यात शिक्षणाचा बाजार मांडला असल्याचा आरोप करत राऊत यांनी मोठा गौप्यस्फोट केला. ''महाराष्ट्रात सध्या बोगस डिग्री स्कॅम सुरू आहे. वाटल्या जाणाऱ्या १० पैकी २ डिग्री या बोगस असतात. माझ्याकडे या प्रकरणाची सविस्तर माहिती आणि पुरावेही आहेत,'' असा मोठा दावा त्यांनी केला.

राज्यातील पेपरफुटीचे सत्र सुरूच असून (पान ४ वर)

# निसर्गाचा कोप की मानवी लोभ?

निसर्गाचे बदलते रूप केवळ 'ग्लोबल वॉर्मिंग'चे अपत्य नाही, तर ते आपण विकासाच्या नावाखाली केलेल्या पर्यावरणाच्या कत्तलीचे आणि नियोजनाच्या नावाने चालवलेल्या अनागोंदीचे थेट फलित आहे. मुंबई, पुणे, बंगळुरूसारखी महानगरे पाण्याखाली जाणे, सह्याद्रीचा कणा ढासळणे ही आता नैसर्गिक नव्हे, तर मानवनिर्मित आपत्ती बनली आहे.

पर्जन्यराजाचे आगमन झाले, की एके काळी बळीराजाच्या डोळ्यात कृतज्ञतेचे प्रबोधन व्हायचे आणि चाकरमान्यांच्या मनात आनंदाचे तरंग उमटायचे; पण आज परिस्थिती बदलली आहे. आता मॉन्सून येतो तो 'आनंद' घेऊन नाही, तर 'धडकी' भरवून... हवामान विभागाने जाहीर केलेल्या देशाच्या मॉन्सून नकाशावर नजर टाकली, तर संपूर्ण देश एका विचित्र हवामान विसंगतीच्या विळख्यात अडकलेला दिसतो. कुठे कोरडा दुष्काळ तर कुठे जलप्रलय! 'अल-निनो'च्या प्रभावामुळे यंदा मॉन्सून सुरुवातीला रेंगाळला, देशातील बहुतांश राज्ये कोरडी राहिली, तर दुसरीकडे अवघ्या काही दिवसांमध्ये ढगफुटीसदृश पाऊस पडून शहरांची आणि नद्यांची दुरवस्था झाली. आज देशातील प्रत्येक मोठे शहर पहिल्याच मुसळधार पावसात 'बेटा'चे स्वरूप धारण करते. शहरे का तुंबतात, या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी फार मोठ्या तज्ज्ञांची गरज नाही. याचे मूळ आपल्या चुकीच्या नागरीकरणात आणि काँक्रीटीकरणाच्या अघोरी हव्यासात दडलेले आहे. गेल्या काही दशकांमध्ये आपण शहरांमधील मातीचा प्रत्येक तुकडा सिमेंट आणि डांबराने गाडून टाकला आहे. पूर्वी पडणारा पाऊस जमिनीमध्ये जिरायचा. त्यामुळे भूजल पातळी वाढायची आणि पाण्याचा प्रवाह संथ व्हायचा. आज शहरांमध्ये माती उरलीच नसल्यामुळे पडणाऱ्या पावसाचा प्रत्येक थेंब थेट रस्त्यावर येतो. काँक्रीटीकरणामुळे पाण्याचा नैसर्गिक निचराच पूर्णपणे बंद झाला आहे. त्यात भर पडली आहे ती आपल्या निकृष्ट ड्रेनेज सिस्टीमची. ब्रिटिश काळात किंवा त्यापूर्वी बांधलेल्या वाहिन्यांवर आज कोट्यवधींच्या लोकसंख्येचा आणि सिमेंटच्या जंगलाचा भार टाकला जात आहे. परिणामी, पुढील आक्रीत ओढवते.

कचरा, प्लास्टिक आणि गाळाने तुंबलेले नाले आणि गटारे एवढ्या प्रचंड पाण्याचा भार पेलू शकत नाहीत. परिणामी, रस्ते हेच नद्या बनतात आणि चकचकीत महानगरे काही तासांमध्येच दलदलीत रूपांतरित होतात. बंगळुरू आणि पुणे ही देशातील 'आयटी हब' आणि शिक्षणाची माहेरघरे म्हणून ओळखली जाणारी शहरे आज पूरपरिस्थितीचे सर्वात मोठे बळी ठरत आहेत. बिल्डर लॉबी आणि भ्रष्ट प्रशासकीय यंत्रणेने मिळून शहरांचा गळा घोटला आहे. पुणे असो वा बंगळुरू; इथे नैसर्गिक ओढे, नाले आणि नद्यांच्या पूररेषा बुडवून टोलेजंग इमारती, 'आयटी पार्क' आणि गृहप्रकल्प उभे राहिले आहेत. बंगळुरूसारख्या शहरात पूर्वी शेकडो तलाव होते. ते एकमेकांशी नैसर्गिक नाल्यांनी जोडलेले होते. अतिरिक्त पाणी एका तलावातून दुसऱ्या तलावात वाहून जायचे. आज ते सर्व नाले आणि तलाव गिळंकृत करून त्यावर सिमेंटचे साम्राज्य उभे राहिले आहे. पुण्यातही बंगळुरूची पुनरावृत्ती झाली आहे. मुळा-मुठा नदीपात्रात झालेली अतिक्रमणे, रामनदी आणि इतर छोट्या ओढ्यांचे अस्तित्व मिटवून टाकल्यामुळे पावसाचे पाणी वाहून जायला जागाच उरलेली नाही.

यासंदर्भात मावळातून वाहणाऱ्या आणि पिंपरी-चिंचवड, पुण्याची तहान भागवणाऱ्या पवना नदीचे उदाहरण ताजे आहे. पवना नदीच्या पाणलोट क्षेत्रात मुसळधार पाऊस झाला, की धरणातून विसर्ग करावा लागतो; मात्र नदीपात्र अरुंद झाल्यामुळे आणि पात्रातच राडारोडा, बांधकामे झाल्यामुळे हे पाणी आजूबाजूच्या नागरी वस्त्यांमध्ये शिरते. यंदा पवना नदीला आलेल्या पुरामुळे शेकडो कुटुंबांना आपले घरदार सोडून सुरक्षित स्थळी स्थलांतर करावे लागले. देहू, आळंदी परिसरातून वाहणाऱ्या पवित्र इंद्रायणी नदीचा प्रकोपही यंदा संपूर्ण महाराष्ट्राने पाहिला. इंद्रायणी नदीला आलेल्या पुरामुळे केवळ शेतीचेच नुकसान झाले नाही, तर उद्योग आणि वाहतुकीचा कणा मोडला. पुणे-नाशिक महामार्गावर चाकण आणि आसपासच्या परिसरात तीन-चार फूट पाणी साचल्याने अलिकडेच वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली. हा महामार्ग राज्याच्या अर्थव्यवस्थेसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. इथे हजारो औद्योगिक कंपन्या आहेत; पण पाण्याचा निचरा होण्यासाठी महामार्गाच्या कडेला आवश्यक त्या वाहिन्याच तयार केल्या गेल्या नाहीत. आजूबाजूच्या टेकड्या आणि नैसर्गिक नाले बुजवून कंपन्या आणि व्यावसायिक गाळे उभारल्यामुळे महामार्गच एका मोठ्या धरणात रूपांतरित झाला. शहरांची ही अवस्था असताना, महाराष्ट्राचे कवच मानल्या जाणाऱ्या सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर वेगळेच आणि अत्यंत भीतीदायक संकट उभे राहिले आहे. महाबळेश्वर, ताम्हिणी, माळशेज, वरंधा आणि आंबेनळी घाटात दर वर्षी होणाऱ्या भूस्खलनाच्या घटनांमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. सह्याद्रीचा डोंगर खचत आहे, रस्ते वाहून जात आहेत आणि दरडी कोसळून निष्पाप लोकांचे बळी जात आहेत. माळीणच्या आठवणी अजून ताज्या असताना आता मावळात पाटणची घटना सुन्न करणारी ठरली. पर्यटन आणि विकासाच्या नावाखाली सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर चाललेली अंदाधुंद तोडफफोड ही त्याची कारणे आहेत. रिसॉर्ट्स बांधण्यासाठी, रस्ते रुंदीकरणासाठी डोंगरांचे पायथे जेसीबी लावून उकरले जात आहेत.

डोंगरांना धरून ठेवणारी झाडे नष्ट केली जात आहेत. यामुळे डोंगराची माती सैल होते आणि मुसळधार पाऊस झाला, की ती थेट खाली कोसळते. सह्याद्रीच्या पर्यावरणाशी चाललेला हा खेळ केवळ घाटापुरता मर्यादित नसून, संपूर्ण किनारपट्टी आणि दख्खनच्या पठाराला धोक्यात आणणारा आहे. या संपूर्ण प्रलयात सर्वात मोठी शोकांतिका पुढेच आहे. एका बाजूला शहरे पाण्यात बुडत असताना 'सेंट्रल वॉटर कमिशन'च्या अहवालानुसार देशातील प्रमुख १६६ धरणांमध्ये केवळ २६ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. दक्षिण भारतात आणि महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये जलाशयांची पातळी सामान्यपेक्षा ४० ते ५० टक्क्यांनी खाली आहे. याचा अर्थ पडणारा पाऊस आपण साठवू शकत नाही. कमी कालावधीत जास्त पावसामुळे पाणी वेगाने वाहून जाते, महापूर येतो आणि पाणी समुद्राला मिळते नीती आयोग म्हणतो, की २०३० पर्यंत देशातील २१ मोठ्या शहरांमधील भूमिगत पाणी संपुष्टात येईल. आपण आज पडणारे पाणी जमिनीखाली जिरवू शकलो नाही, तर पावसाळ्यात पुराच्या पाण्यात बुडणारी हीच शहरे उन्हाळ्यात पाण्यासाठी टँकरच्या रांगेत उभी असलेली दिसतील. आपण आताच सुधारलो नाही, तर डॉ. इस्माइल सेरागेल्डिन यांनी वर्तवलेले भाकीत खरे ठरेल. त्यांच्या म्हणण्यानुसार पुढील युद्धे पाण्यासाठीच होतील. या संकटातून बाहेर पडण्यासाठी आपल्याला युद्धपातळीवर काही पावले उचलावी लागतील. शहरांमधील ओढे, नाले आणि नद्यांच्या पूररेषेवरील सर्व बांधकामे तात्काळ पाडावी लागतील. 'स्पंज सिटी' ही संकल्पना राबवून शहरांमध्ये पाणी शोषून घेणारी उद्याने आणि खुली मैदाने राखली पाहिजेत. रस्ते बांधताना आणि गल्लीबोळात पेविंग ब्लॉक बसवताना पाण्याचा निचरा होण्यासाठी मातीचा भाग सोडणे कायद्याने बंधनकारक केले पाहिजे. घाटमाथ्यावरील आणि संवेदनशील डोंगराळ भागांमधील उत्खनन आणि बेकायदेशीर बांधकामांवर संपूर्ण बंदी घालण्याची वेळ आली आहे. माधव गाडगीळ समितीच्या अहवालाकडे पुन्हा एकदा गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. महामार्ग आणि लोहमार्ग बांधताना पाणी वाहून जाण्याच्या नैसर्गिक मार्गांना धक्का लागणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे. या काही बाबींकडे लक्ष दिले गेल्यास उत्तम, अन्यथा येत्या काळात अनर्थ टाळता येणार नाही.

# धर्मेंद्र प्रधान आजही भाजपाला प्रिय :

कॉक्रोच जनता पार्टीने दिल्लीत जंतरमंतरवर केलेल्या आंदोलनाला देशभर लाखो विद्यार्थी व युवकांचा प्रतिसाद मिळाला. देशातील प्रत्येक शहरातील व गावागावातील तरूणाई रस्त्यावर उतरली व सरकारविरोधी असंतोष प्रकट झाला. गेल्या दहा वर्षात स्पर्धा परीक्षांचे १५२ वेळा पेपर फुटले पण कोणालाही शिक्षा झाली नाही, कोणीही जेलमधे गेले नाही. पेपर फुटीमधे प्रश्न पत्रिका तयार करणाऱ्यापासून शिक्षक, मुख्याध्यापक, कोचिंग क्लासचे संचालक, दलाल, मध्यस्थ अनेक गुंतलेले आढळले. कोट्यवधी रूपयांची पेपर फुटीच्या व्यवहारात देवघेव झाली. लक्षावधी विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ खेळला गेला. दोन वर्षापूर्वी सन २०२४ मधे नीट परीक्षांचे पेपर फुटल्यावर मोठा गहजब निर्माण झाला होता. तेव्हा पंतप्रधानांनी पेपर फुटीला आळा घालण्यासाठी कठोर कायदा आणणार असे प्रत्येक भाषणातून सांगितले होते. प्रत्यक्षात २०२६ मधे पुन्हा नीटचे पेपर फुटल्यानंतर चोवीस विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्यानंतर, कॉक्रोच जनता पार्टीने आंदोलन केल्यानंतर व देशभऱात विद्यार्थ्यांमधे असंतोषाचा डोंब उसळल्यानंतर शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांची उचलबांगडी करण्यात आली . तसेच पेपर फुटीवर दोषींना १० वर्षे तुरुंगात टाकणारे व १० कोटी दंड ठोठावणारे कायद्यात सुधारणा करणारे विधेयक संसदेत मांडण्यात आले.

कॉक्रोच जनता पार्टीने दिल्लीत केलेल्या प्रखर आंदोलनाचे पडसाद देशभरब उमटले. जगात सर्वत्र मिडियाने त्याला ठळक प्रसिध्दी दिली. चलो संसद मोर्चावर दिल्ली पोलिसांनी निर्घृण लाठीमार केला. खिळे ठोकलेल्या लाठ्यांनी मुला- मुलींना बडवले. मुलींचे कपडे फाडले गेले. त्यांचे विनयभंग झाले. दगडफेक झाली. साध्या वेषातील पोलिसांनी आंदोलकांना झोपडून काढले. आंदोलकांना पांगवण्यासाठी प'लेट गन्स व अश्रुधूराचा वापर केला गेला. आंदोलक मुलांची डोकी फुटली.

खरे तर पंतप्रधानांना धर्मेंद्र प्रधानांना सरकारमधून हटवायचे नव्हते. आमच्या सरकारमधून कोणाही मंत्र्याचे राजीनामे होत नाहीत, हे एनडीएचे सरकार आहे, युपीएचे नव्हे असे यापुर्वी केंद्रीयमंत्री राजनाथ सिंग एकदा बडबडले होते. जेन झी आंदोलनातून सरकारची जगभर रोज बेअब्रु होत



होती. अगदी गळ्यापर्यंत आल्यामुळेच प्रधानांना राजीनामा देण्यास सांगण्यात आले.

प्रधानांनी सुध्दा राजीनामा देताना म्हटले, भारताची युवाशक्ति ही या देशाची खरी ताकद आहे. या युवाशक्तिला गैरसमजाच्या चक्रात अडकू देणार नाही, हाच माझा संकल्प आहेः. प्रधानांनी राजीनामा देताना आपले काही चुकले असे म्हटले नाही. विद्यार्थ्यांची माफी मागितली नाही. ज्या २४ परीक्षार्थींनी आत्महत्या केली, त्यांच्याविषयी दुःख व्यक्त केले नाही. प्रधानांना विदयार्थ्यांविषयी एवढी कळकळ असती तर २०२४ मधे नीट पेपर फुटीनंतरच त्यांनी राजीनामा द्यायला हवा होता. तेव्हा तर पेपर फुटीच्या मुद्यावर अनेकांनी सर्वोच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावले होते. त्यापासून काहीच शिक्षणमंत्र्यांनी बोध घेतला नाही, असे म्हणावे लागेल. प्रधानांनी राजीनामा देताना, मुलांवर झालेल्या क्रूर लाठीमाराविषयी खेदही प्रकट केला नाही. नीट युजी २०२६ ची परीक्षा ३ मे २०२६ रोजी झाली. पेपर फुटीचे प्रकरण पुढे आल्यावर तपास यंत्रणांनी वेगाने सुत्रे हलवली. पेपर फुटी मागची साखळी उघड होऊ लागली. शिक्षणमंत्री म्हणून प्रधानांनी हे प्रकरण दाबून टाकले नाही, पेपर तयार करणाऱ्या प्रक्रियेशी संबंधीत, मध्यस्थ, पेपर पोचविणारे सर्व नेटवर्कची कसून तपासणी झाली. सीबीआयने १३ जणांना अटक केली. एखादी चौकशी समिती नेमून हे प्रकरण र्पधानांना शांत करता आले असते. ३० मे रोजी त्यांनी परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला. तेवीस लाख विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली म्हणून आता त्यात काही बदल करता येणार नाही, अशी भूमिका घेतली नाही. परीक्षेच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे म्हणून त्यांनी फेर परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला. विद्यार्थ्यांचे शैक्षणक वर्ष वाया जाऊ नये म्हणून त्यांनी तातडीने पुनर्परिक्षा घेण्याचे ठरवले व २१ जून ही तारीख त्यासाठी जाहीर केली. १६ जुलै रोजी फेर परीक्षेचा निकालही जाहीर झाला. सर्वात महत्वाचे म्हणजे, पुढील वर्षापासून म्हणजेच सन २०२७ पासून नीटची परीक्षा संगणाकाधारित होणार असल्याचे जाहीर केले. यापुढे पेन- पेपर बंद. प्रश्नपत्रिका वाहनाने इकडून तिकडे नेणे बंद. एवढे सर्व तत्परतेने करूनही त्यांच्यावर राजीनामा देण्याची पाळी आली, असा युक्तिवाद त्यांच्या बाजुने केला जातो आहे. केवळ याच वर्षी पेपर फुटला असे नाही तर दहा वर्षात स्पर्धात्मक परीक्षांची १५२ वेळा पेपर फुटी झाली, त्याची जबाबदारी कोणावर ? उत्तरदायित्व कोणावर हा खरा प्रश्न आहे.

जून २०२४ मधे मोदी सरकारमधे धर्मेंद्र प्रधानांनी क'बिनेटमंत्री म्हणून शपथ घेतल्यापासून ते २०२६ मधे नीट पेपर फुटीपर्यंत ते अनेक वादात सापडले. मंत्री म्हणून शपथ घेत असतानाच विरोधी पक्षातील लोकांकडून शेम शे अशा घोषणा दिल्या गेल्या. २०२४ मधे झालेल्या पेपर फुटीबद्दल त्यांना विरोधी पक्ष जाब विचारताना दिसले. सन २०२४ मधे नीटचे पेपर फुटल्याने मोठा गहजब निर्माण झाला होता. सीबीआयकडे चौकशी सोपविण्यात आली होता. पण त्यापासून शिक्षणमंत्र्यानी काही बोध घेतला नाही. नीटचे माजी अध्यक्ष के. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती, त्याचे पुढे काय झाले? २०२६ मधे सीबीएसई १२ वी बोर्डाच्या परीक्षेत उत्तर पत्रिकांचे मुल्यांकन करण्यासाठी ऑन स्क्रिन मर्किंग सिस्टिम लागू केली. पण त्यात तांत्रिक अडचणी खूप असल्याने विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी विरोध केला. प्रधानमंत्री स्कूल फॉर रायजिंग इंडिया या योजनेला तामिळनाडू, तत्कालीन पश्चिम बंगाल, केरळ, पंजाब आदी बिगर भाजपा सरकारांनी विरोध केला. नवी शैक्षणिक धोरण स्वीकारणयासाठी केंद्र सरकार आमच्यावर दबाव आणत आहे, असा त्यांचा आरोप होता. नव्या शैक्षणिक धोरणानुसार त्रिभाषा सुत्र व हिंदी ची सक्तिला बिगर भाजपा राज्यांनी कडाडून विरोध केला. केंद्र सरकार हिंदी भाषा सक्तिची लादत आहे, ते आम्ही स्वीकारणार नाही असा तत्कालीन मुख्यमंत्री स्टलिन यांनी आरोप केला. विद्यापीठांचे कुलगुरू व कुलपती याची नेमणूक करताना जे विद्यापीठ अनुदान आयोगाचे निकष आहेत त्यात त्यांनी बदल केला. शिक्षण क्षेत्राबाहेरील व उद्योग जगतातील व्यक्तिची अशा पदांवर नियुक्ती करता येईल अशी त्यांनी सुधारणा केली. उच्च शिक्षण संस्थांमधे जातीपाती भेदाभेद रोखण्यासाठी समानतेचे सूत्र अवलंबावे असे विद्यापीठ अनुदान आयोगाने सांगितले. पण त्याला संस्थांकडून विरोध झालाच पण सर्वोच्च न्यायालयानेही सुधारणेला स्थगिती दिली. एनसीआरटीच्या पाठ्यपुस्तकातून सन २०२२ - २३ मधे मुघलांचा इतिहास, २००२ ची गुजरात दंगल, शीत युध्द, लोकशाहीतील आंदोलने असे अनेक विषय वगळण्यात आले. विद्यार्थ्यांवरील अभ्यासाचा बोजा हलका करण्यासाठी हे निर्णय घेतले अशी मखलाशी शिक्षणमंत्र्यांनी केली होती.

धर्मेंद्र प्रधान हे संघ स्वयंसेवक आहेत. त्याचे वडिल देवेंद्र प्रधान हेही संघ स्वंयसेवक व ओडिसामधे भाजपाचे ज्येष्ठ नेते. ते अटल बिहारी वाजपेयी यांच्या सरकारमधे १९९८ते २०२४ पर्यंत केंद्रीय राज्यमंत्री होते. म्हणूनच प्रधानांना सरकारमधून हटवणे हे अवघड होते.

संसदेचे पावसाळी अधिवेशन चालू आहे. मंत्रीपदाचा राजीनामा दिल्यानंतर धर्मेंद्र प्रधान हे संसद भवनात गेले, तेव्हा भाजपाच्या खासदारांनी त्यांना शाल पांघरून त्याचे स्वागत केले. धर्मेंद्र प्रधान झिंदाबाद अशा घोषणा दिल्या. विजयी योध्दा आला आहे, अशा थाटात त्यांचा सन्मान केला. त्याला प्रत्युत्तर म्हणून विरोधी पक्षाच्या खासदारांनी चोर चोर- पेपर चोर अशा घोषणा दिल्या. कॉंग्रेसचे नेते पवन खेडा व खासदार रेणका चौधरी यांनी या भाजपाच्या स्वागतावर तीव्र नापसंती व्यक्त केली आहे. बिल्कीस बानो प्रकणात शिक्षा झालेल्यांचे भाजपाने स्वागत केले , तोच भाव प्रधानांचे स्वागत करताना दिसला असे त्यांनी म्हटले. प्रधान हे दोषी आहेत म्हणून त्यांना मंत्रीपदावरून हटवले पण ते संघाचा अजेंडा राबवत होते म्हणून त्यांचे भाजपाने हिरो च्या थाटात स्वागत केले. आजही भाजपाला धर्मेंद्र प्रधान प्रिय आहेत व पक्ष म्हणून भाजपा त्यांच्या पाठिसी भक्कम उभा आहे, हाच संदेश भाजपा खासदारांनी या स्वागतातून दिला.

**– डॉ. सुकत खांडेकर**

# ऐतिहासिक तटबंदीलगतची अतिक्रमणे हटविण्याचे निर्देश; पर्यटनवृद्धीसाठी 'टुरिझम कॉरिडोर' प्रस्ताव तयार करण्याचे आयुक्त अमोल येडगे यांचे निर्देश

छत्रपती संभाजीनगर, दि. २८ (प्रतिनिधी) – छत्रपती संभाजीनगर शहरातील ऐतिहासिक तटबंदी भिंतीलगत तसेच तटबंदीपासून १५ मीटरच्या आत असलेली सर्व अतिक्रमणे तातडीने हटविण्याचे निर्देश आज वारसा जतन समितीच्या बैठकीत देण्यात आले. ही बैठक आयुक्त दालनात समितीचे अध्यक्ष जयंत देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

बैठकीत शहरातील ऐतिहासिक तटबंदी, संरक्षण भिंती व परिसरातील अतिक्रमणांचा आढावा घेण्यात आला. विद्यमान नियमांनुसार तटबंदीपासून १५ मीटरच्या आत असलेली सर्व अतिक्रमणे हटविण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश अध्यक्ष जयंत देशपांडे आणि आयुक्त अमोल येडगे यांनी संबंधित विभागांना दिले.

तसेच शहरातील ऐतिहासिक दरवाजे, तटबंदी भिंती आणि इतर वारसास्थळांवर उगवलेले गवत व झाडाझुडपे तातडीने काढून स्वच्छता करण्याचे निर्देशही देण्यात आले. या कामाची जबाबदारी संबंधित वॉर्ड अधिकाऱ्यांवर निश्चित करण्यात आली.

शहराला लाभलेल्या समृद्ध ऐतिहासिक वारशाच्या जतनासोबतच पर्यटनवृद्धीच्या दृष्टीने 'टुरिझम कॉरिडोर'चा सविस्तर प्रस्ताव तयार करून तो जिल्हा नियोजन समितीकडे निधीसाठी सादर करण्याचे निर्देश आयुक्त अमोल येडगे यांनी दिले.

याशिवाय, हेरिटेज सेस मधून जमा झालेल्या सुमारे ४६ लाख रुपयांच्या निधीतून शहरातील जुन्या पाण्याचे बंबांची संवर्धनाची कामे INTACH (Indian National Trust for Art and Cultural Heritage) यांच्या माध्यमातून करण्यास समितीने तत्त्वतः सहमती दर्शविली. या बैठकीस समितीचे सदस्य सचिव तथा उपसंचालक नगररचना मनोज गर्जे, शहर अभियंता संजय कोंबडे, अतिरिक्त शहर अभियंता अनिल तानपुरे, सहाय्यक नगररचनाकार कौस्तुभ भावे, भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाच्या डॉ. शिल्पा जामगडे, रजनीश कुमार, राज्य पुरातत्त्व विभागाचे व्ही. पी. राठोड, खछढअउक चे मुकुंद भोगले, तसेच महानगरपालिकेचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

# ग्रामीण प्रतिभेपासून आंतरराष्ट्रीय व्यासपीठापर्यंतः एमजीएम आणि टीजीएफतर्फे देशातील पहिल्या प्रकारच्या गोल्फ कॅम्पसची स्थापना

## एमजीएम-टीजीएफ आयजीपीएल नॅशनल गोल्फ टॅलेंट हंट कॅम्पसमध्ये निवासी शिक्षण, व्यावसायिक गोल्फ प्रशिक्षण आणि उद्योगाभिमुख कौशल्य विकासाचा अनोखा संगम

छत्रपती संभाजीनगर, दि. २९ (प्रतिनिधी) – एखाद्या गावातील किंवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील प्रतिभावान मुलामध्ये भारताचे गोल्फमध्ये प्रतिनिधित्व करण्याची क्षमता असू शकते; परंतु गोल्फ कोर्स, व्यावसायिक प्रशिक्षक, आवश्यक उपकरणे, दर्जेदार शिक्षण किंवा स्पर्धांचा अनुभव यांपर्यंत त्याची पोहोच नसू शकते.

ही दरी भरून काढण्यासाठी एमजीएम गोल्फ क्लब आणि द गोल्फ फाउंडेशन (टीजीएफ) यांच्यात एक ऐतिहासिक भागीदारी करण्यात आली असून, त्याअंतर्गत एमजीएम गोल्फ कोर्स, छत्रपती संभाजीनगर येथे एमजीएम-टीजीएफ आयजीपीएल नॅशनल गोल्फ टॅलेंट हंट कॅम्पस स्थापन करण्यात येणार आहे. या देशातील पहिल्या प्रकारच्या उपक्रमाद्वारे उदयोन्मुख युवा गोल्फपटूंचा शोध घेऊन त्यांचा सर्वांगीण विकास केला जाईल. यामध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील तसेच ग्रामीण भागातील मुलांना प्राधान्य दिले जाईल. तळागाळातील प्रशिक्षणापासून व्यावसायिक गोल्फ आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांपर्यंतचा एक नियोजित व सुसंगत प्रवास या उपक्रमाद्वारे उपलब्ध करून दिला जाईल. या कॅम्पसमध्ये प्रारंभी ३० ते ५० निवासी व अनिवासी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जाईल. एमजीएमतर्फे गोल्फ कोर्स, सीबीएसई शाळा, मुला-मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृह सुविधा, प्रशिक्षणासाठी आवश्यक पायाभूत सुविधा आणि स्थानिक स्तरावरील कार्यान्वयनासाठी सहकार्य उपलब्ध करून दिले जाईल. टीजीएफतर्फे शिष्यवृत्ती, व्यावसायिक प्रशिक्षक, गोल्फ उपकरणे, प्रशिक्षण साहित्य, खेळाडूंचे मूल्यमापन तसेच उच्चस्तरीय स्पर्धांमध्ये सहभागी होण्याच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातील.

या भागीदारीचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे व्यावसायिक गोल्फपटू घडविण्यावर विशेष लक्ष केंद्रित करणारी भारतातील पहिली स्वतंत्र निवासी सीबीएसई गोल्फ शाळा विकसित करण्याचा प्रस्ताव. या शाळेत विद्यार्थ्यांचे औपचारिक शिक्षण सुरू ठेवतानाच त्यांना नियोजित गोल्फ प्रशिक्षण, शारीरिक तंदुरुस्ती, कामगिरीचे विश्लेषण आणि स्पर्धांसाठी आवश्यक तयारी करून दिली जाईल.

एमजीएम आणि टीजीएफ यांच्या संयुक्त विद्यमाने एक स्वतंत्र गोल्फ स्किल्स अकॅडमी स्थापन करण्याचेही नियोजन आहे. या अकॅडमीत गोल्फ प्रशिक्षण, स्पर्धा व्यवस्थापन व पंचगिरी, रेफरींग, गोल्फ ऑपरेशन्स, टर्फ व गोल्फ कोर्स व्यवस्थापन, इव्हेंट मॅनेजमेंट आणि क्रीडा प्रशासन या क्षेत्रांमध्ये तीन, सहा आणि नऊ महिन्यांचे प्रमाणपत्र व पदविका अभ्यासक्रम सुरू केले जातील.

या अकॅडमीमुळे प्रशिक्षक, रेफरी, कॅडी, टर्फ तज्ज्ञ, गोल्फ कोर्स व्यवस्थापक, स्पर्धा व्यावसायिक आणि क्रीडा प्रशासक यांच्यासाठी रोजगार व उद्योजकतेच्या संधी निर्माण होतील. शिक्षण, कौशल्य विकास आणि व्यावसायिक प्रशिक्षणाच्या माध्यमातून संपूर्ण गोल्फ परिसंस्थेचा विकास करणे, ही या उपक्रमामागील व्यापक संकल्पना आहे.

अर्जुन पुरस्कार विजेते आणि आशियाई क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक विजेते श्री अमित लुथरा यांनी २००० साली स्थापन केलेल्या द गोल्फ फाउंडेशनने आर्थिकदृष्ट्या दुर्बल पार्श्वभूमीतील ७०० हून अधिक प्रतिभावान युवा गोल्फपटूंना सहकार्य केले आहे. या फाउंडेशनच्या लाभार्थ्यांमध्ये अशोक कुमार, रशीद खान, चिकारंगप्पा, मनू गांधस आणि शुभम जगलान यांसारख्या नामांकित गोल्फपटूंचा समावेश आहे. टीजीएफला भारताच्या माननीय राष्ट्रपतींच्या हस्ते राष्ट्रीय क्रीडा प्रोत्साहन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. एमजीएम गोल्फ कोर्सचा उच्च कार्यक्षमतेच्या प्रशिक्षण केंद्र म्हणून विकास करण्यात येणार आहे. यासाठी गोल्फ कोर्सची खेळण्यायोग्यता अधिक सक्षम करणे, आधुनिक देखभाल यंत्रसामग्रीचा वापर, टर्फची गुणवत्ता सुधारणे, व्यावसायिक प्रशिक्षणासाठी आवश्यक पायाभूत सुविधा उभारणे तसेच प्रगत लॉन्च आणि स्ट्रोक-विश्लेषण तंत्रज्ञान उपलब्ध करून देणे, यावर भर दिला जाईल.

हा उपक्रम भारताच्या पदकांच्या संधी अधिक बळकट करण्यासही मदत करू शकतो. प्रतिभेची लवकर ओळख, सातत्यपूर्ण शिक्षण, व्यावसायिक प्रशिक्षण, शारीरिक तंदुरुस्ती, आधुनिक तंत्रज्ञान आणि स्पर्धांचा अनुभव यांद्वारे आशियाई क्रीडा स्पर्धा, ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा आणि इतर आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी सक्षम गोल्फपटूंची एक भक्कम फळी तयार होऊ शकते.

एमजीएम ट्रस्टचे सचिव श्री ए. एन. कदम म्हणाले : एमजीएमने नेहमीच शिक्षणाच्या माध्यमातून अर्थपूर्ण संधी निर्माण करण्यावर विश्वास ठेवला आहे. ही भागीदारी शिक्षण, निवासी सुविधा आणि व्यावसायिक गोल्फ प्रशिक्षण यांचा समन्वय साधून प्रतिभावान मुलांना यशस्वी भविष्य घडविण्यास मदत करेल. छत्रपती संभाजीनगरचे गोल्फ ॲम्बेसेडर श्री जी. श्रीकांत म्हणाले : हा उपक्रम छत्रपती संभाजीनगरला भारतातील गोल्फ विकासाचे एक महत्त्वपूर्ण केंद्र बनवू शकतो. ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल पार्श्वभूमीतील युवा प्रतिभेला उच्चस्तरीय स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी आवश्यक सुविधा, प्रशिक्षण आणि अनुभव या उपक्रमातून उपलब्ध होतील.

एमजीएम गोल्फ क्लबचे संस्थापक डॉ. रणजीत कक्कड म्हणाले : हा प्रकल्प केवळ गोल्फ शिकविण्यापुरता मर्यादित नाही. तर प्रतिभावान मुलांना शिक्षण, सन्मान, व्यावसायिक संधी आणि भारताचे प्रतिनिधित्व करण्याचा एक खरा मार्ग उपलब्ध करून देण्याचा हा प्रयत्न आहे.

अर्जुन पुरस्कार विजेते, ऑलिम्पियन आणि व्यावसायिक गोल्फपटू श्री गगनजीत भुल्लर यांनी आपल्या संदेशात म्हटले : टीजीएफ, एमजीएम आणि आयजीपीएल यांच्यातील ही अर्थपूर्ण भागीदारी युवा प्रतिभेसाठी नव्या संधी निर्माण करेल आणि तळागाळातील गोल्फच्या विकासाला बळ देईल.

छत्रपती संभाजीनगर आणि परिसरातील युवा गोल्फपटूंसाठी हा उपक्रम खऱ्या अर्थाने परिवर्तनकारी ठरू शकतो, असा मला विश्वास आहे.

श्री लिएंडर पेस यांनी आपल्या संदेशात म्हटले : शिक्षण, शिस्त, दर्जेदार प्रशिक्षण आणि दीर्घकालीन संस्थात्मक पाठबळ यांच्या माध्यमातूनच विजेते घडतात. हा उपक्रम या सर्व घटकांना एकत्र आणतो आणि भविष्यातील विजेते, कुशल क्रीडा व्यावसायिक तसेच आत्मविश्वासपूर्ण युवा नागरिक घडविण्याची क्षमता त्यामध्ये आहे.

या उपक्रमाची घोषणा श्री ए. एन. कदम, श्री जी. श्रीकांत, डॉ. रणजीत कक्कड, श्री अमित लुथरा, श्री गगनजीत भुल्लर, श्री लिएंडर पेस, श्री अखिल नय्यर, श्री अतुल सरीन, श्री शत मिश्रा, आर्किटेक्ट विजित नंद्राजोग, सीएसएन गोल्फचे आश्रयदाते श्री नितीन बागाडिया आणि सीएसएन गोल्फच्या आश्रयदात्या श्रीमती डिंपल बिंद्रा यांच्या उपस्थितीत करण्यात आली. एमजीएम-टीजीएफ आयजीपीएल नॅशनल गोल्फ टॅलेंट हंट कॅम्पस हे शिक्षण, सामाजिक समावेशकता, व्यावसायिक कौशल्य विकास आणि उच्च कार्यक्षमतेच्या क्रीडाक्षेत्राचा संगम असलेले राष्ट्रीय स्तरावरील एक आदर्श केंद्र म्हणून विकसित करण्याची संकल्पना आहे. या उपक्रमामुळे भारतीय गोल्फच्या नव्या पर्वाच्या केंद्रस्थानी छत्रपती संभाजीनगरची ओळख अधिक भक्कम होईल. आयजीपीएलमध्ये आम्ही भारतभर गोल्फच्या विकासाला गती देण्यासाठी आणि हा खेळ अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी कटिबद्ध आहोत. द गोल्फ फाउंडेशनसोबतच्या आमच्या भागीदारीद्वारे, तळागाळातील स्तरावर गोल्फला बळकटी देणाऱ्या उपक्रमांना आम्ही सक्रियपणे पाठिंबा देणार असून, देशभरातील गोल्फ परिसंस्थेच्या सर्वांगीण विकासातही योगदान देणार आहोत. एकत्रितपणे आम्ही युवा प्रतिभांसाठी अधिक संधी निर्माण करत असून, ऑलिम्पिकचे स्वप्न साकार करण्याचे ध्येय ठेवले आहे.

# गुरूपौर्णिमा निमित्त वैजापूरच्या श्री. स्वामी समर्थ केंद्रात विविध कार्यक्रम; स्वामी दर्शनासाठी मोठी गर्दी






वैजापूर, दि. २९ (प्रतिनिधी) – श्री.स्वामी समर्थ केंद्रात गुरू पोर्णिमा निमित्त बुधवार(ता,२९)रोजी सकाळ पासून विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.यात सकाळी सर्व प्रथम स्वामी महाभिषेक कार्यक्रम झाला,नंतर शहरातील बहुसंख्य महिला व पुरुषांनी ,स्वामींचे चरित्र पारायण केले,सकाळी साडे दहा वाजता स्वामींची महा आरती सम्पन्न झाली, गुरू पौर्णिमा निमित्त गुरुपद दिवसभर चालणार आहे.स्वामी सेवेकरी समाधान गडाख यांनी अभिषेक केला.स्वामी सेवेकरी,सुमनबाई आलूले,सुरेश आलूले तसेच सोनाली त्रिभुवन, अनिता राजपूत,तुषार अनर्थे, श्रेयस चव्हाण यांनी कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेतला.

या प्रसंगी सेवेकरी सर्वश्री सी.के. पवार,सचिन राजपूत गणेश संतपाळ,सौ,तूपे ताई, धोंडीरामसिंह राजपूत यांची उपस्थिती होती.सकाळ पासून श्री.स्वामींच्या दर्शनासाठी शहराच्या सर्व भागातून सेवेकरीनी व भक्त भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

# बौद्ध लेणी–हनुमान टेकडी परिसरात बेगमपुरा पोलिसांची कडक गस्त; पर्यटकांच्या सुरक्षेसाठी विशेष मोहीम

## मद्यपान, छेडछाड व गैरप्रकारांवर पोलिसांची करडी नजर






छत्रपती संभाजीनगर, दि. २९ (प्रतिनिधी) – छत्रपती संभाजीनगर शहरातील ऐतिहासिक बौद्ध लेणी, हनुमान टेकडी आणि निपट निरंजन महाराज परिसरात पर्यटक व नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी बेगमपुरा पोलिसांनी विशेष सुरक्षा मोहीम हाती घेतली आहे. परिसरात वाढणारी पर्यटकांची गर्दी लक्षात घेता मद्यपान, अमली पदार्थांचे सेवन, मुलींची छेडछाड, विनाकारण गर्दी, रीलसच्या नावाखाली होणारे अनुचित प्रकार तसेच किरकोळ भांडणांच्या घटनांना आळा घालण्यासाठी पोलिसांनी कडक गस्त सुरू केली आहे.

बेगमपुरा पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रवीणा यादव यांच्या मार्गदर्शनाखाली डायल ११२ पेट्रोलिंग, मार्शल पेट्रोलिंग आणि महिलांच्या सुरक्षेसाठी दामिनी पथकाची विशेष गस्त तैनात करण्यात आली आहे. संपूर्ण परिसरात संशयास्पद हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत असून नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यावर भर दिला जात आहे.

### नागरिकांना सहकार्य करण्याचे आवाहन

‘पोलीस सदैव नागरिकांच्या सेवेसाठी तत्पर आहेत. मात्र सुरक्षित, शांततापूर्ण आणि स्वच्छ वातावरण कायम राखण्यासाठी नागरिकांचे सहकार्यही तितकेच महत्त्वाचे आहे. सर्वांनी जबाबदारीने वर्तन करून या ऐतिहासिक व धार्मिक स्थळाचे पावित्र्य जपावे आणि कोणताही गैरप्रकार आढळल्यास तात्काळ पोलिसांना माहिती द्यावी,‘ असे आवाहन वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रवीणा यादव यांनी केले.

**स्वतः प्रवीणा यादव यांनी घेतला बंदोबस्ताचा आढावा –** वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रवीणा यादव यांनी स्वतः हनुमान टेकडी व लेणी परिसराची पाहणी करून पोलीस बंदोबस्ताचा आढावा घेतला. यावेळी पोलिसांनी संशयास्पद व्यक्ती, ट्रिपल सीट दुचाकी, संशयास्पद कार व वाहनांची कसून तपासणी केली. विनाकारण फिरणाऱ्या काही व्यक्तींवर तसेच वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाईही करण्यात आली.

**सायंकाळी सहानंतर डोंगर परिसरात न जाण्याचे आवाहन –** बौद्ध लेणी सायंकाळी ६ वाजता बंद होत असल्याने त्यानंतर पर्यटक व नागरिकांनी सुरक्षिततेच्या दृष्टीने डोंगर परिसरात थांबू नये किंवा विनाकारण फिरू नये, असे आवाहन पोलिसांनी ध्वनिक्षेपकाद्वारे केले. रात्रीच्या वेळेत परिसरात अनावश्यक वावर टाळण्याचेही नागरिकांना सांगण्यात आले.

**रील्ससाठी नव्हे, धार्मिक व ऐतिहासिक वारशासाठी हा परिसर**

यावेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रवीणा यादव यांनी तरुण–तरुणींना विशेष आवाहन करताना सांगितले की, गोगाबाबा टेकडी, बौद्ध लेणी व हनुमान टेकडी परिसर हा धार्मिक, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा लाभलेला परिसर आहे. येथे येणाऱ्या प्रत्येकाने सामाजिक जबाबदारीचे भान ठेवावे. परिसरात अनेक ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे कार्यरत असून प्रत्येक हालचालीवर पोलिसांचे बारकाईने लक्ष आहे. अश्लील वर्तन, मुलींची छेडछाड, मद्यपान, नशा करणे, अनुचित रील्स तयार करणे किंवा कायदा–सुव्यवस्थेला बाधा आणणारे कोणतेही कृत्य सहन केले जाणार नाही. अशा प्रकारांमध्ये आढळणाऱ्यांवर थेट गुन्हे दाखल करून कठोर कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला.

### ठळक मुद्दे

- बौद्ध लेणी, हनुमान टेकडी व निपट निरंजन महाराज परिसरात विशेष पोलीस गस्त.
- डायल ११२, मार्शल पेट्रोलिंग व दामिनी पथकाची संयुक्त कारवाई.
- ट्रिपल सीट, संशयास्पद वाहने व विनाकारण फिरणाऱ्यांवर कारवाई.
- सायंकाळी ६ नंतर डोंगर परिसरात न जाण्याचे आवाहन.
- मद्यपान, छेडछाड, अश्लील कृत्ये व अनुचित रील्स करणाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशारा.
- सीसीटीव्हीद्वारे परिसरावर सतत नजर; नागरिकांना पोलिसांना सहकार्य करण्याचे आवाहन

# शिवराम मंदिर व शततारा शाळेच्या संयुक्त विद्यमाने गुरुपौर्णिमा निमित्त व्याख्यांन



वैजापूर, दि. २९ (प्रतिनिधी) – शिवराम मंदीर व शततारा विद्यालयात गुरुपौर्णिमा येथील विद्यानगर मधील श्री .शिवराम मंदिर व शततारा शाळेच्या संयुक्त विद्यमाने गुरुपौर्णिमा निमित्त बुधवार(ता.२९) रोजी प्रबोधनकार सौ.रश्मीताई नागापूरकर यांचे गुरू पौर्णिमा विषयावर व्याख्यांन झाले तसेच शहरातील शासनाचा डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार व पद्मश्री दादासाहेब गायकवाड समाज भूषण पुरस्कार मिळालेले सेवा निवृत्त शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत याचा गुरू पोर्णिमा निमित्त सत्कार कार्यक्रम संपन्न झाला. सौ. रश्मीताई नागापूरकर यांनी गुरू शिष्य नाते, पारनेरकर महाराज यांचे समाज प्रबोधन विचार ,व सामाजिक स्थिती ,संस्कार, व ढासळत असलेली नितीमत्ता, अशा सर्वांगीण विषयावर त्यांनी उपस्थित महिला व पुरुषाना मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी जेष्ठ सेवा निवृत्त शिक्षक अशोक .जी.मांजरे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून विलासराव संत यांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमात बालाजी टेके,शिलाताई संत,सविता अनर्थे, रजनी मांजरे,मंगेश मांजरे, योगेश मांजरे,संजय वाणी,श्री निकम,प्रीती भालेराव ,पद्मा टेके, व सरिता वैद्य यांच्या सह महिला व पुरुष मोठया संख्येने उपस्थित होते.

# कुसुमताई बागुल यांचे वृद्धपकाळाने निधन

वैजापूर, दि. २९ (प्रतिनिधी) – आंबेडकरी चळवळीच्या विचार प्रवाहातील संघर्षशील व्यक्तिमत्व व जेष्ठ महिला कार्यकर्त्या कुसुमताई कुशनराव बागुल यांचे बुधवार(ता२९) रोजी सकाळी



वृद्धपकाळाने राहत्या घरीदुःखद निधन झाले. देवाज्ञा समयी त्या८०वर्षाच्या होत्या. येथील अमरधाम मध्ये त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी चार वाजता अंतिम संस्कार करण्यात आले.

या समयी जि.प.चे माजी अध्यक्ष एकनाथराव त्रिभुवन, माजी प.स.सदस्य देविदास जाधव,सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत ,डॉ, संतोष गंगवाल,रवी बनकर,यशवंत पडवळ, साहेबराव पडवळ, गंगाधर त्रिभुवन, शाहीर अशोक बागुल, धनेधर, अशोक तांबुस आप्पा,एम.आर.गणवीर ,मोती वाघ ,प्रशांत त्रिभुवन,आबासाहेब कसबे,यांनी श्रद्धांजली अर्पण केली.त्यांच्या पश्चात्य पती,चार विवाहित मुली,व एक विवाहित मूलगा, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# श्री स्वामी मच्छिंद्रनाथ महाराज मंदिर, मिटमिटा येथे गुरुपौर्णिमा उत्सव साजरा

छत्रपती संभाजीनगर, दि. २९ (प्रतिनिधी) – श्री स्वामी मच्छिंद्रनाथ व श्री सप्तशृंगी माता मंदिर मिटमिटा येथे गुरुपौर्णिमा उत्सव असंख्य भक्त व शिष्यांच्या उपस्थितीत अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला

सकाळी सात वाजता श्री वेदांत रत्नपारखी यांच्या हस्ते परात्पर सद्गुरू स्वामी श्री माच्छिंद्रनाथ महाराज यांचे पूजन व गुरुपौर्णिमेचे हवन करण्यात आले .

प्रात:स्मरण , मानसपूजा ,स्वामी श्री मच्छिंद्रनाथ महाराज यांना १०८ वेळा अनुग्रह मंत्राच्या जपाने विभूती अभिषेक, मंगलगाथा पोथीचे चक्रीपारायण, परमपूज्य सद्गुरु डॉ. श्री मंगलनाथ महाराज यांच्या समाधीला गंगोदकाने सिंचन व शिष्यांनी पारिसा वर गुरू मंत्राचे नामस्मरण करत उगाळून तयार केलेल्या चंदनाचे लेपन व विभुती अभिषेक करण्यात आला. नारायण पूजन नागपूर येथून आलेले श्री. दिलीप व सौ प्रतिमा रोडी यांच्या हस्ते झाले .

असंख्य शिष्य आणि नाथ भक्तांच्या सहभागाने महाआरती संपन्न झाली. मिटमिटा परिसरातील असंख्य भाविक भक्तांनी दर्शन घेऊन कृपाशिर्वाद व महाप्रसादाचा लाभ घेतला. श्री प्रतिष्ठान ट्रस्ट च्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन देखील करण्यात आले होते यामध्ये १५ जणांनी रक्तदान केले . गुरुपौर्णिमेच्या पावन पर्वा वर नियोजित परम पूज्य सद्गुरु श्री मंगलनाथ महाराजांच्या मंदिराचे भूमि पूजन संपन्न झाले. गुरुपौर्णिमेच्या पूर्वसंध्येला दिनांक २८.०७.२०२६



रोजी ठाणे येथील सुप्रसिद्ध कीर्तनकार डॉ श्री प्रसाद भंडारी यांचे कीर्तन झाले.अमरावती येथील श्री नरेंद्र केवले यांनी ‘ परम पूज्य सद्गुरु श्री मंगलनाथ महाराज यांचे अलौकिक आध्यात्मिक जिवन व त्यांचे लोकोत्तर कार्य या विषयावर अतिशय सुंदर , भावपूर्ण प्रवचन झाले.

मिटमिटा येथील शाळेतील विद्यार्थ्यांना , गुरूमाता पूज्य सौ माधवीताई माधवराव रत्नपारखी यांच्या स्मरणार्थ त्यांचे सुपुत्र श्री वेदांत रत्नपारखी यांच्या वतीने संगीत वाद्य वही, पेन याचे वाटप करण्यात आले.

तसेच शाळेतील दहावीत उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना शाल आणि ध्यानाचा ओम ( momento) देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. अभ्यास करतांना लक्षब विचलित झाल्यास या ओम च्या सहाय्याने एकाग्रता साधण्यास मदत होईल तसेच स्वामी आणि श्री मंगलनाथ महाराजांची कृपा आणि आशीर्वाद सदैव तुमच्या सोबत असल्याचे श्री वेदांत रत्नपारखी यांनी सांगत गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्यात. शाळेचे मुख्याध्यापक श्री नन्नवरे यांनी रत्नपारखी कुटुंबिय, श्री मच्छिंद्रनाथ मंदिर तसेच श्री प्रतिष्ठान ट्रस्ट यांचे आभार मानले व अशीच कृपा आणि आशिर्वाद कायम रहावे असे मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी मोठ्या संख्येने शिष्य व भक्तांची उपस्थिती होती. मुंबई, नागपूर, बंगलोर अमरावती,अकोला, पुणे, जळगाव, नाशिक, रावेर आदी ठिकाणहून बरीच शिष्य मंडळी या कार्यक्रमा साठी आली होती. मिटमिटा आणि परिसरातील हजारो भाविक भक्तांनी सुद्धा दर्शन व महाप्रसादाचा लाभ घेतला याप्रसंगी श्री चंद्रकांतजी खैरे माजी महापौर माननीय श्री नंदकुमारजी घोडेले, नगरसेवक श्री किरण मानकापे,श्रीशंकरअण्णाश्री जालिंदर शेंडगे, श्री हिवराळे, श्री जगन्नाथ काळे यांनीही दर्शन घेतले.

# ७५ कविता संग्रहाचे पुस्तक ‘लढा’ माजी नगराध्यक्षा शिल्पाताई परदेशी व नगराध्यक्ष डॉ.दिनेश परदेशी यांना गुरुपौर्णिमादिनी भेट

वैजापूर, दि. २९ (प्रतिनिधी) – मराठवाड्याचे जेष्ठ बाल साहित्यिक व सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी, समाज कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत यांच्या ‘लढा’ या कविता संग्रहात जीवनातील विविध क्षेत्रातील महिला, पुरुष, सैनिक, दिव्यांग, शेतकरी. शेत मजूर, कामगार,जेष्ठ नागरिक, तरुण, तरुणी यांच्या जीवनात येणारे प्रश्न, गंभीर समस्या यांच्याशी लढताना ज्या व्यथा येतात त्या काव्य रुपात लिहून दाद मागणाऱ्या कविता आहेत. या कविता संग्रहात ७५ कविता आहेत.हा कविता संग्रह नुकताच उपलब्ध झालेला आहे. कवी धोंडीरामसिंह राजपूत यांनी गुरू पौर्णिमा बुधवार (ता.२९)दिनी सदरील काव्य संग्रह ‘लढा’ माजी नगराध्यक्षा शिल्पाताई परदेशी व विद्यमान नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी यांना शिवराणा व्यायाम शाळेने आयोजित केलेल्या कार्यक्रमात भेट म्हणून दिला.या समयी व्यायाम शाळेचे पदाधिकारी उपस्थित होते.



# ‘ड्रग्स फ्री मुंबई’ मॉडेलचा राज्यभर विस्तार; राज्यातील सर्व शाळा आणि महाविद्यालयांमध्ये ’नशामुक्ती मार्गदर्शन व समुपदेशन समिती’ स्थापन करण्यात येणार

मुंबई, दि. २९ (प्रतिनिधी) – ‘आदरणीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी जी यांच्या नेतृत्वात संपूर्ण देशात अमली पदार्थांविरुद्ध एक मोठा लढा उभारण्यात आला आहे. याच लढ्याला महाराष्ट्रात माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस जी यांच्या नेतृत्वाखाली अधिक बळ मिळत आहे. ’ड्रग्स फ्री मुंबई’ अभियानाचे मॉडेल आता संपूर्ण राज्यात राबविण्यात येणार आहे. मुंबईसह राज्यातील सर्व शाळा आणि महाविद्यालयांमध्ये ’नशामुक्ती मार्गदर्शन व समुपदेशन समिती’ची स्थापना होणार आहे. माझ्या निवेदनाची दखल घेत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतल्याबद्दल मी माननीय मुख्यमंत्र्यांचे मनःपूर्वक आभार मानतो,‘ असे नशामुक्ती जनजागृती अभियानाच्या उच्चस्तरीय समितीचे अध्यक्ष तथा कॅबिनेट मंत्री श्री. मंगल प्रभात लोढा यांनी सांगितले.

या समित्यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये व्यसनांविषयी सातत्याने जनजागृती केली जाईल. विद्यार्थ्यांच्या वर्तनातील बदल वेळेत ओळखून त्यांना आवश्यक समुपदेशन उपलब्ध करून देणे, पालक व शिक्षकांमध्ये समन्वय साधणे तसेच गरज भासल्यास संबंधित तज्ज्ञांकडे मार्गदर्शनासाठी संदर्भित करण्याची जबाबदारीही या समित्यांवर असेल.

केंद्र शासनाने २०२९ पर्यंत देश अमली पदार्थमुक्त करण्याचे उद्दिष्ट निश्चित केले असून, त्यासाठी सर्व विभागांच्या समन्वयातून अमली पदार्थांविरोधात प्रतिबंधात्मक कारवाई आणि व्यापक जनजागृती करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने महाराष्ट्र शासनानेही राज्यात व्यसनमुक्तीची चळवळ अधिक प्रभावी करण्यासाठी विविध उपाययोजना सुरू केल्या आहेत.

३० जुलै रोजी वरळी डोम येथे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ’ड्रग्स फ्री मुंबई’ अभियानाचा शुभारंभ होत आहे. हा केवळ उद्घाटनाचा कार्यक्रम नसून वर्षभर चालणारी जनचळवळ आहे.

या अभियानामध्ये विद्यार्थी, शिक्षक, पालक, स्वयंसेवी संस्था, मानसोपचारतज्ज्ञ, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना तसेच समाजातील विविध घटकांचा सक्रिय सहभाग निश्चित करण्यात आला आहे. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये वर्षभर विविध जनजागृतीपर उपक्रम, मार्गदर्शन सत्रे,

समुपदेशन कार्यक्रम तसेच व्यसनमुक्तीविषयी संवादात्मक उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

व्यसनमुक्त महाराष्ट्र घडविण्याच्या या लोकचळवळीत विद्यार्थी, पालक, शिक्षक, स्वयंसेवी संस्था तसेच सर्व नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन कॅबिनेट मंत्री श्री. मंगल प्रभात लोढा यांनी केले आहे.

# वडोद कान्होबा येथील न्यू हायस्कूल शाळेत आषाढी एकादशी उत्साहात

खुलताबाद, दि. २९ (प्रतिनिधी) – मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ छत्रपती संभाजीनगर संचलित न्यू हायस्कूल वडोद कान्होबा ता. खुलताबाद जिल्हा छत्रपती संभाजीनगर. येथे आषाढी एकादशीच्या निमित्ताने आज दिनांक २५ जुलै २०२६ वार शनिवार रोजी दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.आषाढी एकादशीच्या दिवशी श्री विठ्ठलाच्या चरणी अपार श्रद्धा ठेवून मनातील सर्व दुःख, चिंता दूर व्हावेत, आषाढी एकादशी महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाचा सर्वात मोठा उत्सव मानला जातो. आषाढ महिन्यातील शुक्ल पक्षातील एकादशीला ’देवशयनी’ किंवा ‘आषाढी एकादशी’ म्हणतात.भाविक या दिवशी विठ्ठल–रुक्मिणीची पूजा करून उपवास करतात व निरोगी, सुखमय जीवनासाठी प्रार्थना करतात.पंढरपूरची वारीपायी दिंड्या, महाराष्ट्राच्या विविध संतांच्या पालख्या (उदा. संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज) आळंदी व देहूवरून शेकडो किलोमीटरचा प्रवास करत वारकरी वाजत–गाजत, टाळ–मृदुंगाच्या




गजरात आणि ’ज्ञानबा–तुकाराम’ व ‘विठ्ठल–विठ्ठल’ नामाचा जयघोष करत चालतात.समता आणि ऐक्य: वारीमध्ये जात, पात, उच्च–नीच असा कोणताही भेद नसून सर्वजण विठ्ठलमय होऊन जातात. या दिंडी सोहळ्यात विद्यालयाच्या वतीने बरेच विद्यार्थी वारकऱ्याच्या पारंपारिक वेशभूषेत सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी दिंडी सोहळ्यात टाळांचा गजर, हरिपाठ, गवळणी सादर केल्यात. विद्यार्थ्यांना विद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती निकम मॅडम यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची रूपरेषा सांस्कृतिक विभागाचे प्रमुख श्री शार्दुल सर व श्रीमती जाधव मॅडम तसेच कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री पडवाल सर,श्री शिंदे सर, श्री चौधरी सर श्रीमती थोटे मॅडम यांनी परिश्रम घेतले. तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांना फराळ व केळी देऊन दिंडीचा समारोप करण्यात आला. हा कार्यक्रम खूप उत्साहात व आनंदात पार पडला.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# श्री क्षेत्र वेरूळ येथे गुरुभक्तांचा महासागर; गुरुपौर्णिमा महोत्सव भक्तिमय वातावरणात संपन्न

वेरूळ दि.२९ (प्रतिनिधी)- निष्काम कर्मयोगी शिवयोगी जगद्गुरू जनार्दन स्वामी (मौनगिरीजी) महाराज यांच्या पावन स्मृतींना अभिवादन करत श्री क्षेत्र वेरूळ येथे गुरुपौर्णिमा महोत्सव अत्यंत भक्तिमय वातावरणात आणि मोठ्या उत्साहात संपन्न झाला. जगद्गुरू स्वामी शांतिगिरीजी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या भव्य सोहळ्यास मुसळधार पावसाचीही पर्वा न करता लाखो भाविकांनी उपस्थिती लावली.

पहाटेपासूनच आश्रम परिसरात भाविकांची मोठी गर्दी उसळली होती. 'जय बाबाजी'च्या अखंड जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. गुरुचरणी नतमस्तक होण्यासाठी आणि आशीर्वाद घेण्यासाठी भाविकांनी मोठ्या श्रद्धेने दर्शन रांगेत सहभाग घेतला.

गुरुपौर्णिमेनिमित्त गुरु पूजन, धार्मिक विधी, प्रवचन, भजन-कीर्तन तसेच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. जगद्गुरू स्वामी शांतिगिरीजी महाराज यांनी उपस्थित भाविकांना आध्यात्मिक मार्गदर्शन करत गुरुसेवा, मानवसेवा आणि समाजहिताचे महत्त्व अधोरेखित केले.

दिवसभर सुरू असलेल्या धार्मिक कार्यक्रमांमुळे श्री क्षेत्र वेरूळ भक्तिमय वातावरणाने न्हाऊन निघाले. मुसळधार पाऊस सुरू असतानाही





भाविकांचा उत्साह किंचितही कमी झाला नाही. शिस्तबद्ध नियोजन आणि स्वयंसेवकांच्या सेवेमुळे संपूर्ण महोत्सव शांततेत व उत्साहात पार पडला.

**नाथ आश्रमात भक्तांची अलोट गर्दी; सद्‌गुरु अक्काताई महाराजांचे आशीर्वाद**

बारावे ज्योतिर्लिंग श्री घृष्णेश्वर मंदिर यांच्या सानिध्यातील श्री क्षेत्र वेरूळ येथील नाथ आश्रमात गुरुपौर्णिमा महोत्सव अत्यंत भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. गुरुवर्य सद्गुरु अक्काताई महाराज यांच्या पावन उपस्थितीत हजारो नाथभक्तांनी गुरु पूजन करून आशीर्वाद घेतला.

गुरुपौर्णिमेनिमित्त पहाटेपासूनच नाथ आश्रमासह परिसरातील विविध मठ, आश्रम आणि मंदिरांमध्ये भक्तांची मोठी गर्दी झाली होती. गुरु महिमा जाणत भाविकांनी आपल्या गुरूंचे पूजन करून सेवा अर्पण केली आणि आशीर्वाद प्राप्त केला.

या कार्यक्रमाला वेरूळ गावच्या सरपंच कुसुमताई प्रकाश पाटील मिसाळ, उपाध्यक्ष प्रकाश वाकळे, भाजप तालुकाध्यक्ष प्रकाश चव्हाण, पंचायत समितीचे माजी सभापती तथा सदस्य दिनेश अंभोरे, नगरसेवक परसराम बारगळ, उद्योजक शेखनाथ पाटील नागे, उद्योजक मनसाराम मातकर, ह.भ.प. नारायण भांबर्डे, तुकाराम मते, कैलास मिसाळ, संतोष करपे, श्रीमती कल्पना कदम, गणेश गायके, पुंजाराम धोत्रे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी विविध पवित्र नद्या व तीर्थक्षेत्रांमधून आणलेल्या जलाने सद्गुरु अक्काताई महाराज यांचे पूजन करण्यात आले. तसेच नाथ भक्त परिवारातील युवकांनी श्रीक्षेत्र मढी ते श्रीक्षेत्र वेरूळ अशी पायी दिंडी व कावड यात्रा काढून आणलेल्या पवित्र जलाने भगवान मच्छिंद्रनाथ यांना जलाभिषेक केला.

सद्गुरु अक्काताई महाराज यांनी गुरुपौर्णिमेनिमित्त उपस्थित भक्तांना शुभाशीर्वाद देताना जीवनमूल्ये, पर्यावरण संवर्धन, शिक्षणाचे महत्त्व आणि व्यसनमुक्त जीवन याविषयी मार्गदर्शन केले. 'भक्तांनी सन्मार्गाचा अवलंब करावा, व्यसनांपासून दूर राहून शिक्षण, संस्कार आणि सामर्थ्य निर्माण करावे. त्यातूनच व्यक्ती, कुटुंब आणि समाजाचा सर्वांगीण विकास होईल,' असा मोलाचा संदेश त्यांनी दिला. कार्यक्रमाची सांगता महाप्रसादाने झाली. गुरुपौर्णिमेच्या या सोहळ्यामुळे संपूर्ण नाथ आश्रम परिसर भक्तिरसाने आणि अध्यात्मिक उत्साहाने भारावून गेला.

## विद्यार्थ्यांच्या आंदोलनात राजकीय घुसखोरीचा आरोप; उदय सामंतांचा काँग्रेसवर घणाघात

छत्रपती संभाजीनगर दि.२९ (प्रतिनिधी)- राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत आज गुरुपौर्णिमेनिमित्त छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वेरुळ येथे दर्शनासाठी आले होते. यावेळी माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी राज्यातील अनेक घडामोडींवर सविस्तर भाष्य केले. विद्यार्थ्यांच्या आंदोलनावरून त्यांनी काँग्रेसवर जोरदार निशाणा साधला. काँग्रेसने आपले राजकीय अस्तित्व टिकवण्यासाठी विद्यार्थ्यांच्या खांद्यांचा वापर करू नये, असे सामंत म्हणाले. यासोबतच, मनोज जरांगे पाटील यांचा आंदोलनाचा इशारा, कंगना रनौत यांचे वादग्रस्त वक्तव्य आणि शेतकऱ्यांचे प्रश्न या सर्व मुद्द्यांवर त्यांनी राज्य सरकारची भूमिका स्पष्ट केली.

विद्यार्थ्यांच्या आंदोलनाबाबत बोलताना उदय सामंत म्हणाले की, विद्यार्थ्यांनी केलेल्या आंदोलनाचे श्रेय लाटण्याचा अनेक जण प्रयत्न करत आहेत. या आंदोलनामध्ये काही राजकीय पुढारी जाणीवपूर्वक घुसले होते आणि त्यांनी या आंदोलनाची दिशा बदलण्याचा प्रयत्न केला. अभिजित दिपके यांनी पुन्हा दिलेल्या आंदोलनाच्या इशाऱ्यावर ते म्हणाले की, दिपके यांनी मांडलेली भूमिका सरकार नक्कीच ऐकून घेईल. कुठल्याही विद्यार्थ्याला त्रास होणार नाही, याची काळजी सरकार घेत असून यावर लवकरच सकारात्मक तोडगा काढला जाईल. खासदार आणि अभिनेत्री कंगना रनौत यांनी विद्यार्थ्यांबाबत केलेल्या वक्तव्यावरून सध्या मोठा वाद सुरू आहे. यावर सामंत यांनी स्पष्टीकरण दिले. कंगना रनौत यांनी जे काही स्टेटमेंट केले आहे, ते त्यांचे पूर्णपणे वैयक्तिक मत आहे. त्यांच्या या वक्तव्याशी आमचा किंवा आमच्या पक्षाचा काहीही संबंध नाही, असे सामंत म्हणाले. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा २९ ऑगस्टपासून 'निर्णायक आंदोलना'चा इशारा दिला आहे. या पार्श्वभूमीवर सामंत यांनी संवादाची भूमिका मांडली. ते म्हणाले, 'मनोज जरांगे पाटील यांच्या मनात आरक्षणाच्या अनुषंगाने काही शंका असतील, तर सरकार त्यांच्या त्या सर्व शंकांचे नक्कीच निरसन करेल. मंत्री गुलाबराव पाटील यांनी केलेल्या एका वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना सामंत यांनी सरकारच्या प्राधान्यक्रमाबाबत भाष्य केले. 'आमचे सरकार नेहमीच सर्वात आधी शेतकऱ्यांच्या समस्यांकडे लक्ष देते आणि त्यानंतरच उद्योगांकडे लक्ष जाते,' असे सांगत शेतकऱ्यांचे हित हेच सरकारचे मुख्य उद्दिष्ट असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## गुरुपौर्णिमेनिमित्त आर्यानंदी कॉलोनी येथे आचार्य श्री हेमसागर गुरुदेव यांच्या गुरुपूजनाचा सोहळा उत्साहात संपन्न



छत्रपती संभाजीनगर दि.२९ (प्रतिनिधी)- चन्द्रप्रभ दि जैन मंदिर,आर्यानंदी कॉलोनी येथे गुरुपौर्णिमेच्या पावन पर्वानिमित्त तपस्वी सम्राट आचार्य गुरुवर १०८ श्री सन्मतिसागरजी महाराज आणि सिद्धान्त चक्रवर्ती आचार्य श्री हेमसागरजी गुरुदेव यांच्या गुरुपूजनाचा भक्तिमय व मंगलमय सोहळा मोठ्या उत्साहात आणि श्रद्धाभावाने संपन्न झाला.

कार्यक्रमाची सुरुवात भगवान श्रीजींच्या पवित्र पंचामृत अभिषेकाने झाली. त्यानंतर वाद्यांच्या मंगल निनादात परमपूज्य गुरुवरांचे आगमन झाले व भक्तिभावाने पादप्रक्षालन करण्यात आले. आचार्य श्री सन्मतिसागरजी महाराज तसेच सिद्धांत चक्रवर्ती आचार्य गुरुवर १०८ श्री हेमसागरजी महाराज यांच्या संगीतमय पूजनाचा भावपूर्ण कार्यक्रम पार पडला.

या संगीतमय पूजनाचे सादरीकरण श्री सुमितजी खेडकर यांनी आपल्या मधुर, ओजस्वी आणि भक्तिमय वाणीने केले. त्यांच्या सुमधुर सादरीकरणामुळे संपूर्ण वातावरण भक्तिरसाने भारावून गेले आणि उपस्थित भाविकांना अविस्मरणीय आध्यात्मिक अनुभूती मिळाली.

या यशस्वी आयोजनात सौ. प्रियांका प्रितेशजी गंगवाल यांनी आकर्षक व सुंदर पूजन थाळी संच तयार करून मोलाचे योगदान दिले. तसेच एका आवाहनावर सर्व भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत कुटुंबासह मोठ्या संख्येने उपस्थित राहून गुरुपूजनात सहभागी होत कार्यक्रमाची शोभा वाढवली.

यावेळी गुरुवरांच्या चरणी सर्वांनी श्रद्धापूर्वक वंदन करून आशीर्वाद घेतला. या वेळी हेमसागरजी गुरुदेव यानी आपल्या प्रवचनात उपस्थितांना गुरुवरांचे आशीर्वाद लाभावेत आणि सर्वांच्या जीवनात धर्म, शांती व मंगलमयता नांदो, अशी प्रार्थना केली. गुरुपौर्णिमेचा हा भक्तिमय सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण आणि आध्यात्मिक वातावरणात संपन्न झाला.

# मुल्यांवरील निष्ठा, पालकांचे आशिर्वाद आणि कष्टाची तयारी असल्यास कोणीही यशस्वी होऊ शकतात - मनपा आयुक्त अमोल येडगे

## मौलाना आझाद महाविद्यालयात पदवी वितरण समारंभ उत्साहात

छत्रपती संभाजीनगर दि.२९ (प्रतिनिधी)- यशाच्या मार्गात अडथळे फार असतात. तुम्हाला काही मिळवायचे असेल तर मेहनत घ्यावी लागेल आणि स्वतःवर विश्वास ठेवावा लागेल. शिस्त, वेळेचे व्यवस्थापन आणि कष्टाच्या बळावर तुम्ही हवे ते प्राप्त करू शकता. असे छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे आयुक्त अमोल येडगे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले.

मौलाना आझाद महाविद्यालयात बुधवार (दि. २९) रोजी गुरू पौर्णिमेचे औचित्य साधत पदवी वितरण समारंभ उत्साहात पार पडला. या समारंभास मनपा आयुक्त अमोल येडगे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. हा कार्यक्रम मौलाना आझाद शिक्षण सोसायटीचे अध्यक्ष फरहत जमाल यांच्या अध्यक्षतेखाली महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये ११ वाजेला सुरू झाला. यावेळी काळे उद्योग समुहाचे संचालक



अंकित काळे, एम. डी. पाटील व्हेंचरचे व्यवस्थापकीय संचालक अनिकेत पाटील, प्राचार्य डॉ. मजहर अहमद फारुकी, उपप्राचार्य डॉ. आरिफ पठाण यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली. पुढे येडगे म्हणाले, नोकरी मिळणे हे यशस्वी होण्याचे परिमाण नाही. आपली मूल्ये जपणे, स्वतःप्रती प्रामाणिक राहत आणि अडथळांना पार करत आनंदी जीवन जगणे; हे यशस्वी होणे आहे. जीवनात खूप काही मिळविता येऊ शकते. त्यासाठी स्वतःवर विश्वास ठेवून मेहनत केली पाहिजे. मोठमोठी स्वप्ने पहा, मोठे ध्येय समोर ठेवा आणि ते प्राप्त करण्यासाठी कष्ट करा, तुम्ही यशस्वी व्हाल. असे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

काळे उद्योग समुहाचे संचालक अंकित काळे मनोगत व्यक्त करताना म्हणाले, विद्यार्थ्यांनी स्वतःला सतत अद्ययावत केले पाहिजे. शिक्षण हे निव्वळ पैसा, नोकरी यासाठीच नसून तणावविरहित आणि समाधानी जीवनासाठीही आवश्यक आहे. आपल्या शिक्षणाचा उपयोग समाज उत्थानासाठी करायला हवा. विद्यार्थांनी सजग नागरिक बनून देशहित जपले पाहिजे, असे मत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोपात मा. फरहात जमाल यांनी पदवीधरांना शुभेच्छा देत पालकांचा त्याग आणि आपली मूल्ये न विसरण्याचे आवाहन केले. फरहत जमाल, अंकित काळे, अनिकेत पाटील आणि प्राचार्य डॉ. मजहर अहमद फारुकी यांच्या हस्ते ६९ विद्यार्थ्यांना पदवी वितरित करण्यात आली. या सोहळ्याला महाविद्यालयात सर्व प्राध्यापकवृंद, पदवीप्राप्त विद्यार्थी आणि त्यांचे कुटुंबीय मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. आभार प्रदर्शन डॉ. अश्फाक शेख यांनी तर सूत्रसंचालन डॉ. अपर्णा सराफ यांनी केले. कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीताने करण्यात आला.

# मनपा शाळा एन-सेवन सिडको शाळेत गुरूपौर्णिमा उत्साहात साजरी !

छत्रपती संभाजीनगर दि.२९ (प्रतिनिधी)- महानगरपालिका केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय एन सेवन सिडको छत्रपती संभाजीनगर शाळेत गुरूपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शाळेचे मुख्याध्यापक मनोज अग्रवाल यांनी भूषवले. विदयार्थ्यांनी भाषणे केली. श्रीमती अंजली कुलकर्णी व वेंकट जाधव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांनी केले.




कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी शाळेतील शिक्षिका सौ. संगीता अंबेकर, सुनीता पाटील, वैशाली सुरडकर, मंगला महाजन, अंजली कुलकर्णी, स्वाती घोडतुरे, दीपाली औटे, शिल्पा बहुरे, वैशाली देशमुख, मंजुश्री राठोड, वेंकट जाधव, शुभांगी चव्हाण, दीपक पडोळ, संदिप कळंबे, सागर मगरे, ज्ञानेश्वर असोलकर, पल्लवी क्षीरसागर, प्रितीश सराटे, सुशील दांडगे, फिरदोस नदाफ, सबासदफ सिद्दीकी, पल्लवी क्षीरसागर, बोरसे, सुनंदा सदावर्ते, अंकिता बोचरे, आश्विनी घोडके, निशांत जडे या सर्व शिक्षक शिक्षिकांनी आणि रमेश देवडे, विजय गायकवाड, अविनाश भोंबे या सेवकांनी सक्रियपणे सहभाग घेतला.

## बाल विवाह प्रतिबंध जनजागृती अभियान; शुक्रवारी विशेष मुलाखतीचे आकाशवाणीवरुन प्रसारण



छत्रपती संभाजीनगर दि.२९ (प्रतिनिधी)- जिल्ह्यात सुरु असलेल्या बालविवाह प्रतिबंध जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. याबाबत सविस्तर माहिती देणारी मुलाखत शुक्रवार दि.३१ रोजी सकाळी ८ वा. ४० मि. नी प्रसारीत होणार आहे. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कोमल कोरे व जिल्हा शिक्षणाधिकारी आश्विनी लाठकर ह्या या अभियानाविषयी माहिती देणार आहेत. आकाशवाणीच्या एफ.एम. १०१.७ वाहिनीवरुन हे प्रसारण श्रोत्यांना ऐकता येणार आहे. जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने यांनी या दोन्हीही अधिकाऱ्यांशी बातचीत केली आहे. आकाशवाणी छत्रपती संभाजीनगरचे कार्यक्रम अधिकारी सुजीत बनसोडे हे या कार्यक्रमाचे सादरकर्ते आहेत.

ही मुलाखत अत्यंत उद्बोधक व माहितीपुर्ण असून बाल विवाह प्रतिबंध जनजागृती अभियान, बाल विवाह त्याचे सामाजिक, मानसिक परिणाम याबाबत जाणून घेण्यासाठी अवश्य ऐकावी. श्रोत्यांना एफ.एम. १०१.७ Mhz या वाहिनीवर ही मुलाखत ऐकता येईल आणि News on AIR ॲप वर ही मुलाखत देशभरात कोठेही ऐकता येणार आहे.

(पान १ वरुन)

### नीट-यूजी पेपरफुटी प्रकरण;...

आरोप आहे.

मनीषा वाघमारे, धनंजय लोखंडे, शुभम खैरनार व डॉ. मनोज शिरुरे यांनी मध्यस्थ म्हणून प्रश्नांचे वितरण करून इच्छुक विद्यार्थ्यांशी संपर्क साधल्याचा आरोप आहे. शिक्षण विभागाच्या १२ मे २०२६ च्या तक्रारीनंतर सीबीआयने गुन्हा नोंदवला होता. परीक्षा ३ मे रोजी झाली होती. प्रश्नांच्या मूळ स्त्रोतापासून लाभार्थी विद्यार्थ्यापर्यंतची साखळी उघड झाल्याचा सीबीआयचा दावा आहे. प्रश्नांच्या बदल्यात आर्थिक व्यवहार झाल्याने बँक खाती गोठवली आहेत.

सीबीआयने दोषारोपपत्रात ३६० साक्षीदार, ४२२ कागदपत्रे आणि ४३ भौतिक पुराव्यांचा आधार घेतला आहे. तपासासाठी ७२ अधिकारी व आठ सायबर न्यायवैद्यक तज्ज्ञांची पथके स्थापन करण्यात आली होती. महाराष्ट्र, राजस्थान, हरियाणा आणि दिल्लीसह विविध राज्यांतील ९२ ठिकाणी छापे टाकले. मोबाईल, संगणक, डिजिटल संदेश आणि आर्थिक व्यवहारांची न्यायवैद्यक तपासणी करण्यात आली.

### तुकाराम मुंढेंचा आता शाळांकडे...

पुरवणाऱ्या सर्व संस्था आणि पुरवठादारांकडे भारतीय अन्न सुरक्षा व मानक प्राधिकरणाचा वैध परवाना असणे अनिवार्य करण्यात आले आहे. वैध परवानाधारक संस्थांकडूनच अन्नाची खरेदी करता येणार आहे.

विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यदायी आहाराच्या सवयी विकसित करण्यासाठी शाळेच्या परिसरात हाय फॅट, हाय सॉल्ट आणि हाय शुगर पदार्थांच्या विक्रीवर निर्बंध घालण्यात आले आहेत. शाळेच्या ५० मीटर परिसरात अशा पदार्थांची विक्री तसेच त्यांच्या जाहिरातींनाही पूर्णपणे बंदी असेल. या नियमांची अंमलबजावणी आणि देखरेख करण्याची प्राथमिक जबाबदारी संबंधित शाळा व्यवस्थापनावर सोपविण्यात आली आहे.

### मनोज जरांगेंकडून...

२९ ऑगस्टला शेवटचं खूप मोठ निर्णायक आंदोलन करायचं आहे, आपल्या ५८ लाख नोंदी राज्यात सापडल्या. त्यांना वारंवार सांगतो त्यांचे प्रमाणपत्र द्या. सरकार नोंदी प्रमाणे प्रमाणपत्र देत नाही म्हणून आंदोलन करण्यात येणार आहे. ज्यांच्या नोंदी सापडल्या त्यांनी अर्ज दाखल करा. तीन वर्ष समाजाच्या कल्याणासाठी रक्त जळतोय. मला निर्णायक शेवटच आंदोलन करायचे आहे. एक तर ते जातील नाहीतर मी जाईल. २९ ऑगस्ट ला कोणीही घरी थांबायचे नाही. आपल्याला हैदराबाद गॅझेट दिले, प्रमाणपत्र कधी द्यायचे. सरकारला प्रश्न करत जरांगे म्हणाले, हैदराबाद गझेटीयर दिले, प्रमाणपत्र कधी देता? फडणवीस साहेबांनी मराठ्यांची लेकरं टार्गेट केले, असंही पुढे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.

### मराठा समाजासाठी जे कुणीच केलं..

नागपूर शहरात झालेल्या ढगफुटीसदृश पावसावर फडणवीस यांनी चिंता व्यक्त केली. "नागपुरात एका महिन्याचा पाऊस अवघ्या एकाच दिवसात पडला आहे. यामुळे शहरातील अनेक सखल भागांत पाणी साचले असून, ३ शाळांमध्ये तर विद्यार्थ्यांना बाहेर काढण्यासाठी रेस्क्यू ऑपरेशन राबवावे लागले, अशी माहिती त्यांनी दिली. शहरात सुरू असलेल्या रस्त्यांच्या कामांमुळेही काही ठिकाणी पाणी साचल्याची कबुली त्यांनी दिली. तसेच, आजही संध्याकाळी मुसळधार पावसाची शक्यता असल्याने नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन त्यांनी केले आहे.

मराठा आरक्षणासाठी कुणबी जात प्रमाणपत्रांच्या मागणीवरून मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा उपोषणाचा आणि आंदोलनाचा इशारा दिला आहे. यावर प्रतिक्रिया देताना फडणवीस म्हणाले की, "महायुती सरकारने मराठा समाजाच्या हितासाठी जे ऐतिहासिक निर्णय घेतले, ते यापूर्वी कोणत्याही सरकारने घेतले नव्हते. असे असले तरी, जर मनोज जरांगे पाटील यांच्या मनात अजूनही काही शंका किंवा सरकारबद्दल रोष असेल, तर आम्ही त्यावर चर्चेतून नक्कीच योग्य मार्ग काढू.

### राज्यात २ हजार शाळा बंद,...

सरकार त्याबाबत अजिबात गंभीर नाही, अशी टीका राऊत यांनी केली. शिक्षणातील भ्रष्टाचारावर बोलताना ते म्हणाले की, "नवीन शाळांना मंजुरी देण्यासाठी संस्थाचालकांकडून ५ ते १० लाख रुपये उकळले जात आहेत. पैशांशिवाय शिक्षणात कोणतेही काम होत नाही." असा आरोप राऊत यांनी केला. एकीकडे नवीन शाळांना मंजुरी दिली जात असताना दुसरीकडे राज्यातील तब्बल २ हजार शाळा बंद पडल्याची खंत राऊत यांनी व्यक्त केली. शिक्षकांना लावल्या जाणाऱ्या शालाबाह्य कामांवर (सर्व्हेक्षण आणि इतर कामे) त्यांनी तीव्र आक्षेप घेतला. "तुम्ही शिक्षकांना इतर अवांतर कामे लावली आहेत. जर ते हीच कामे करत राहतील, तर मग त्यांनी मुलांना शिकवायचे कधी? राज्यात अनेक तरुण बेरोजगार आहेत, त्यांच्या हाताला काम नाही. शासनाची ही सर्व कामे या बेरोजगार मुलांना द्यावीत, जेणेकरून शिक्षकांना फक्त शिकवण्यावर लक्ष केंद्रित करता येईल," असा सल्ला राऊत यांनी दिला.

## ज्येष्ठ संगीतकार हृदयनाथ मंगेशकरांना व्ही शांताराम पुरस्कार, प्रसाद ओक, सलीम खान, राणी मुखर्जींचाही सन्मान!

मुंबई दि.२९ (प्रतिनिधी)- राज्य सरकारचे प्रतिष्ठेचे समजले जाणारे व्ही. शांताराम आणि राज कपूर पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. यंदाचा चित्रपती व्ही शांताराम जीवन गौरव पुरस्कार ज्येष्ठ संगीतकार हृदयनाथ मंगेशकर यांना जाहीर करण्यात आलाय. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने बुधवारी ही घोषणा केली असून चित्रपटसृष्टीत मोलाचे योगदान देणाऱ्या दिग्गज कलाकारांचा या पुरस्काराने सन्मान करण्यात येणार आहे. तसेच अभिनेते प्रसाद ओक यांना चित्रपट क्षेत्रातील विशेष योगदानासाठी व्ही शांताराम पुरस्काराने गौरवण्यात येणार आहे. हिंदी चित्रपट सृष्टीतील ज्येष्ठ लेखक सलीम खान यांना राज कपूर जीवन गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला असून अभिनेत्री राणी मुखर्जीचाही राज कपूर विशेष योगदान पुरस्काराने गौरव करण्यात येणार आहे.चित्रपट क्षेत्रात दीर्घकाळ उल्लेखनीय योगदान देणाऱ्या अभिनय, संगीत, दिग्दर्शन, निर्मिती अशा विविध क्षेत्रात काम करणाऱ्या मान्यवरांचा गौरव करण्यासाठी हे पुरस्कार दिले जातात. सांस्कृतिक कार्य विभागाने बुधवारी २०२५चा व्ही शांताराम जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ संगीतकार हृदयनाथ मंगेशकर यांना जाहीर झाल्याचा सांगितलं. पं हृदयनाथ मंगेशकर यांची मराठी आणि हिंदी चित्रपट गीतांसह भक्तीगीत भावगीत आणि शास्त्रीय संगीतावर आधारित रचनांसाठी ओळख आहे. अभिनय क्षेत्रातील हरहुन्नरी अभिनेता प्रसाद ओक यांनाही मराठी चित्रपट नाटक आणि टीव्ही क्षेत्रातील योगदानासाठी व्ही शांताराम पुरस्कार देण्यात येणार आहे. धर्मवीर आणि धर्मवीर २ या चित्रपटांच्या दिग्दर्शनामुळे देशभरात त्यांचे चर्चा झाली.